# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. २६/०८/२०२२**

शुक्रवार दि. २६/०८/२०२२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा दुपारी १२.३० वाजता सभा सुचना क्र. ०४ दि. **२२/०८/२०२२** रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सभागृह नेता |
| ४) | शाह राकेश रतिशचंद्र | सभापती, स्थायी समिती |
| ५) | पाटील धनेश परशुराम | विरोधी पक्षनेता |
| ६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ७) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ८) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ९) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| १०) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १३) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १४) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १५) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| १६) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| १७) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १८) | जैन गीता भरत | सदस्या. |
| १९) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २०) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २१) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| २२) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| २३) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| २४) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| २५) | शेख अमजद गफार | सदस्य |
| २६) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| २७) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २८) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| २९) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ३०) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ३१) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३२) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ३३) | मेहता डिम्पल विनोद | सदस्या |
| ३४) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ३५) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ३६) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ३७) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ३८) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ३९) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४०) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४१) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ४२) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ४३) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ४४) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ४५) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ४६) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ४७) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ४८) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ४९) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५०) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ५१) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ५२) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ५३) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ५४) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ५५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५६) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५७) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ५८) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ५९) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ६०) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ६१) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ६२) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ६३) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ६४) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ६५) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ६६) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ६७) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ६८) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ६९) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ७०) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ७१) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |
| ७२) | शर्मा भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७३) | ॲड शफीक अहमद सादत खान | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | भोसले अनिल बाबुराव | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | अजित भगवान पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | सिंह विक्रमप्रताप रमाप्रती | नामनिर्देशित सदस्य |

<u>गैरहजर सदस्य -</u>

| | | |
|---|---|---|
| १) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| २) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| ३) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| ४) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| ५) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| ६) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| ७) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| ८) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| ९) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| १०) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| ११) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| १२) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| १३) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| १४) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| १५) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| १६) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| १७) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| १८) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| १९) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| २०) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| २१) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| २२) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |

रजेचा अर्ज - निरंक

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा शुक्रवार दि. २६/०८/२०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०४ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम विषय चालू करत असताना जो अभिनंदनाचा प्रस्ताव आहे जे आपल्याला अभिनंदन करायचे आहे ते कमीत कमी 3 तासापासून बसलेले आहेत त्यासाठी त्यांना अभिनंदन करण्यात यावे ही विनंती आहे. महापौर मॅडम.

**अभिनंदन ठराव क्र. 48 :-**

नागरीकांमध्ये लोकप्रिय असलेल्या आणि गोरगरीबांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे मा. महासभा दि.२६/०२/२०२० रोजी महापौर पदी विराजमान झाल्या. **महापौर पदाचा कार्यभार स्विकारल्या** प्रारंभीच उद्भवलेल्या कोरोना संकटांचा सामना त्यांनी निडरपणे करुन आणि लोकप्रतिनीधी, प्रशासन, पत्रकार बंधु, नागरीक यांना सोबत घेवून कोरोनाला पूर्णपणे शहरातून हटविणेकामी केलेल्या यशस्वी प्रयत्नांचे कौतुक करावे तितके कमी आहे.

मिरा भाईंदर शहरात विविध ठिकाणी प्रशस्त / सुशोभित उद्याने, सी.सी. रस्ते, मुबलक पाणी, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहरातील सफाई / स्वच्छता, पर्यावरणाचा समतोल राखणेकामी विविध ठिकाणी केलेले वृक्षारोपण, क्रिडा रसिकांकरीता मैदाने, प्रेक्षक गॅलरी, विद्यार्थ्यांकरीता वाचनालये, अभ्यासिका, ओपन जिम, अपंग व दिव्यांग व्यक्तींना सोयीसुविधा, महिलांचे सक्षमीकरण, वैद्यकीय आरोग्य सुविधा तसेच महापालिका शाळेतील शैक्षणिक दर्जा वाढविणे इ. नागरीकांच्या मुलभूत सोयी सुविधा पुरविणेकामी त्यांचा नेहमीच ध्यास राहीला.

**मा. महापौर यांच्या महापौर पदाच्या कालावधीमध्ये मिरा भाईंदर** शहराची वाढती लोकसंख्या व शहरवासियांच्या मुलभूत गरजा लक्षात घेवून त्यांनी काही लोकहितावह विकास कामे पूर्ण केली.

**वैद्यकीय विभाग-**

- कोरोना कालावधीमध्ये कोविड रुग्णांना आवश्यक औषधोपचार मिळणेकामी पं. भीमसेन जोशी रुग्णालयासोबतच स्व.प्रमोद महाजन सभागृह, अप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह, स्व. मीनाताई ठाकरे सभागृह आणि भाईंदर (पु.) येथील स्व. बाळासाहेब ठाकरे मैदानामध्ये भव्य कोविड केअर सेंटर, अलगीकरण केंद्राचे निर्माण केले.
- दुसऱ्या लाटेमध्ये अत्यावस्थ कोविड रुग्णांच्या उपचाराकरीता विविध ठिकाणी ऑक्सीजन प्लांटची निर्मिती केली तसेच कोविड चाचणी केंद्र स्थापन करुन मॉलीक्युलर RTPCR लॅब देखील कार्यान्वीत करण्यात आली.
- कोविड कालावधीमध्ये रुग्णांचा मृत्युदर कमी करणेकरीता पं. भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय येथे ICU विभागात Tele ICU सुविधा सुरु करुन २४X७ वैद्यकीय तज्ज्ञा मार्फत दाखल रुग्णांची आरोग्य स्थिती तसेच उपचारांवर सतत देखरेख ठेवून तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे अत्यवस्थ रुग्णांचे प्राण वाचविणे शक्य झाले व मृत्यूदर ५०% पर्यंत कमी करण्यास मदत झाली.
- सर्व प्राधिकृत कोविड रुग्णालयांची नावे तसेच त्याठिकाणी आक्सिजनयुक्त / ICU सुविधेसह / व्हेंटिलेटर्ससह त्या-त्यावेळी उपलब्ध असलेल्या खाटांची माहिती (Real Time Information) नागरीकांना मिळण्यासाठी तात्काळ २४ X ७ वॉर रुमची स्थापना करण्यात आली.
- कोविड लसीकरणाची शासन मार्गदर्शनानुसार दि.१६ जानेवारी २०२१ रोजी सुरुवात करुन वेळोवेळी शासकीय कोविड केंद्रामध्ये वाढ करुन विशेष कोविड लसीकरण मोहिमेतंर्गत तृतीयपंथीय, अंथरुणात खिळलेले, अपंग व दिव्यांग, ओळखपत्र नसलेले व गरोदर मातांना कोविड लसीकरणाचा लाभ देण्यात आला.
- लॉकडाऊन मध्ये नागरीकांनी घरात सुरक्षित रहावे याकरीता मा. महापौर स्वत:, पोलिस कर्मचारी, लोकप्रतिनीधी आणि प्रशासन अधिकारी यांचेसह रस्त्यावर उतरुन जनजागृती करताना आपण सर्वांनी पाहिले.
- मिरा भाईंदर क्षेत्रातील गोरगरीब, गरजू जनतेला कोविड काळात भोजनाची घरपोच व्यवस्था प्रशासनाच्या तसेच विविध संस्था, मंडळे यांच्या माध्यामातून केली.

**बांधकाम विभाग-**

- मौजे गोडदेव आरक्षण क्रमांक १२२ या जागेत हिंदू हृदय सम्राट मा श्री बाळासाहेब ठाकरे तसेच आरक्षण क्र. ३००, मेरीगोल्ड जवळ स्व.प्रमोद महाजन कलादालनाचे भूमीपुजन करण्यात आले.
- शहरात विविध ठिकाणी प्रशस्त व सुशोभित उद्याने, मैदाने, चौकांचे निर्माण करण्यात आले.
- अनधिकृत वाहन पार्किंग रोखणेकामी १८१ ट्रॅफिक जामर वाटप
- आरक्षण क्र.230 येथे बुध्द विहार व विपश्यना ("धम्म सम्राट अशोक बुध्द विहार") केंद्राचे निर्माण
- आरक्षण क्र. ३६० या ठिकाणी प्रथमच मे.अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई प्रा.लि यांच्या CSR फंडामधून उद्यान विकसीत करण्यात येत आहे.
- महाजनवाडी येथील तरण तलाव
- विविध परिसरात सी.सी. रस्ते विकसीत करण्यात आले

**BSUP प्रकल्प -**

- केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुर्नरुत्थान अभियाना अंतर्गत "शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे" या उपक्रमा अंतर्गत काशिमिरा येथील जनता नगर व काशीचर्च या दोन झोपडपट्टयांमध्ये मुलभूत सुविधांसह पुरविण्याकरीता प्रकल्प अहवाल तयार करुन म्हाडा मार्फत केंद्र शासनास सादर केला होता.
- इमारत क्र.६ एकुण २९४ सदनिका सोळाव्या मजल्यांपर्यंत RCC चे काम पूर्ण झाले आहे. पात्र लाभार्थ्यांसोबत नोंदणीकृत करारनामा करुन सदनिका वितरण करण्याचे काम सुरु आहे.
- इमारत क्र.७ एकुण ३६२ सदनिका इमारतीच्या पहिल्या मजल्याचे काम पूर्ण झाले असुन दुसऱ्या मजल्याचे काम सुरु आहे.
- इमारत क्र.२ एकुण २९९ सदनिका चौदाव्या मजल्यापर्यंतचे RCC काम पूर्ण झाले असुन नवव्या मजल्याचे ब्रिक वर्कचे काम सुरु आहे.
- इमारत क्र.३ एकुण २९९ सदनिका सोळाव्या मजल्यापर्यंतचे RCC काम पूर्ण झाले असुन चौदाव्या मजल्यापर्यंत ब्रिक वर्कचे काम पूर्ण आहे.
- इमारत क्र.४ एकुण २९९ सदनिका, सहाव्या मजल्यापर्यंतचे RCC काम पूर्ण झाले आहे.
- इमारत क्र.५ एकुण २९९ सदनिका, प्लींथचे काम पूर्ण झाले आहे.
- काशी चर्च इमारत क्र.३ एकुण १२९ सदनिका इमारतीचे ६०% RCC काम आठव्या मजल्यापर्यंत पूर्ण ब्रीक वर्क चे काम आठव्या मजल्यापर्यंत पूर्ण झाले आहे.
- १५० कोटी कर्जाकरीता महाराष्ट्र शासनाने मंजुरी, ४० कोटी MMRDA कडून मंजुर पैकी ८ कोटी मनपास प्राप्त झाले आहे.
- लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या सदनिकेची संख्या २९४ (इमारत क्र.६)
- प्रकल्पाची सद्यस्थिती जनता नगर इमारत क्र.२,३,४,५,७ चे काम प्रगतीपथावर (१५५० सदनिका)
- काशी चर्च इमारत क्र.३ चे काम प्रगतीपथावर (१२९ सदनिका)
- दलित वस्ती निधीतून १२ कोटी मंजूर करुन सिमेंट रस्ते व गटारे कामाचा शुभारंभ केला.

**कर विभाग —**

- मालमत्ता करामध्ये ५% सवलत देण्यात आली.
- ऑनलाईन बिल भरणा ॲपची सुरुवात करण्यात आली.

**पाणी पुरवठा विभाग-**

- मिरा भाईंदर शहराकरीता २१८ MLD पाणी पुरवठा वितरण करणेकरीता नविन मुख्य जलवाहिनी व २३ जलकुंभ विकसीत करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत मंजुरीस्तव सादर करण्यात आलेला असुन प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे.
- वेळोवेळी MIDC प्राधिकरणाचे अधिकारी तसेच स्टेम प्राधिकरणाचे अधिकारी यांच्या समवेत बैठका घेवून शहरास होणाऱ्या अपुऱ्या पाणीपुरवठा तसेच मंजुर कोट्यानुसार न मिळणारे पाणी, वारंवार होणारे शटडाऊन, जुनी पाईपलाईन दुरुस्ती अशा विविध विषयाबाबत आंदोलन करुन शहरातील पाणी प्रश्न मार्गी लावण्यास मोठ्या प्रमाणावर यश मिळविले आहे. तसेच अत्यंत गरज असलेल्या विभागात पाईपलाईन वितरण करण्यात आली.

**आरोग्य विभाग -**

- स्वच्छ भारत अभियान सर्वेक्षणामध्ये १) सन २०२० मध्ये राष्ट्रीय स्तरावर १९ व राज्यस्तरावर ४ क्रमांक, तसेच २) सन २०२१ यावर्षी राष्ट्रीय स्तरावर ३१ वा व राज्यस्तरावर ९ क्रमांक प्राप्त झाला.
- मिरा भाईंदर महापालिकेस **"कचरा मुक्त शहर"** म्हणून गौरविण्यात आले याबाबत सन २०१९-२० यावर्षी थ्री स्टार नामांकन प्राप्त झाले.

**परिवहन विभाग -**

- परिवहन उपक्रमाच्या "माझी बस" प्रवाश्यांकरीता अॅन्ड्राईड मोबाईल अॅप

- प्रवाश्यांच्या सोयीकरीता इलेक्ट्रीक बस खरेदीस मान्यता दिली
- घोडबंदर येथे प्रशस्त असे “नाना शंकर शेठ” बस डेपो विकसीत करण्यात आले

**शिक्षण विभाग –**

- यावर्षी पासून इयत्ता १ ली ते ९ वी चे वर्ग सुरु करुन मनपा शाळांमध्ये डिजीटल वर्गांचे निर्माण केले.
- मनपा विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, पुस्तके, बुट, दप्तरे इ. वाटप करण्यात आले.
- मनपा शाळा क्र.४ काशी मराठी या शाळेची महापालिकेच्या आदर्श शाळा म्हणून शासनामार्फत निवड करण्यात आली.

**अग्निशमन विभाग -**

- अग्निशमन विभागाकरिता ६८ मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर (टी.टी.एल) वाहन
- अग्निशमन विभागाची ए.एल.पी.वाहन (एरियल लँडर प्लॅटफॉर्म) तसेच अग्निशमन ताप्यात नवीन सहा अग्निशनम वाहने घेण्यात आल्या व पेणकरपाडा येथे अग्निशमन केंद्राचे निर्मिती केली.

**महिला व बालकल्याण विभाग-**

- स्व. इंदिरा गांधी रुग्णालय येथे गरजू महिलांसाठी Mammography (मॅमोग्राफी) वय ४० वर्षावरील महिलांकरिता स्तन कॅन्सर मोफत वैद्यकीय तपासणी शिबीराचे आयोजन
- महिलांचे सक्षमीकरण करणेकामी महापौर निवास स्थानाचे महिला भवनामध्ये रुपांतर करुन सदर महिला भवनामध्ये कापडी पिशव्या बनविणे, MSCIT बेसिक कॉम्प्युटर, डीटीपी टॅली, ज्युडो कराटे, योगा इ. विषयांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.
- शहरातील गरीब व गरजु महिलांना स्वयंरोजगार मिळणेकामी रिक्षा, शिलाई मशिन, इडली मेकरचे मोफत वाटप करण्यात आले.
- कोविड कालावधीमध्ये ५० वर्षाखालील विधवा महिलांना रु.४०००/- प्रमाणे आर्थिक मदत देण्यात आली.
- शहरातील कॅन्सर पिडीतांना, रु.२५०००/-, विधवा महिलांच्या मुलांच्या शिक्षण व मुलीच्या विवाहाकरीता आर्थिक मदत देण्यात येत आहे.
- महिला व बालकल्याण समितीच्या वतीने स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये नवजात शिशुंकरीता “पाळणा” व प्रसृतीकरीता येणा-या महिलांकरीता “पलंग (बेड)” देण्यात आले.
- ५० वर्षावरील विधवा महिलांकरीता महिला व बालकल्याण समितीच्या “मायमाऊली” या योजने अंर्तगत वार्षिक रक्कम रु.५०००/- अनुदान सुरु करण्यात आले.

**पशु संवर्धन विभाग -**

- शहरातील मोकाट पशु-प्राण्यांच्या उपचाराकरीता पशुवैद्यकीय विभागास रुग्णवाहिका

**उद्यान विभाग –**

- आरक्षण क्र. २३० येथे ग्रीन यात्रा या संस्थेने स्व-खर्चाने १०,००० रोपांची लागवड करुन मियाँ वॉकी उद्यानाचा लोकार्पण करण्यात आले.
- माझी वसुंधरा अभियाना 2.0 अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेस अमृत गटामध्ये राज्य स्तरावर “भुमी” थिमॅटीक भागात अतिउत्कृष्ठ कामाबाबत पुरस्कार तसेच रु.१ करोड राशीचे पारितोषिक देण्यात आले.
- माझी वंसुधरा अभियाना अंर्तगत पक्ष्यांकरीता फिडर बसविण्यात आले.

**आस्थापना विभाग-**

- महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आली तसेच प्रथमच महापालिकेमार्फत "उकृष्ट कर्मचारी" म्हणून पालिका अधिकारी व कर्मचारी यांचा महाराष्ट्र दिनी गौरव करण्यात आला.

मा. महापौर यांचा शहरातील गोरगरीब, मागासवर्गीय नागरीक, आदीवासी पाडे, विविध समाजउपयोगी प्रकल्प/योजना व शहरातील विविध भागात विकास कामे हाती घेवून ती मुदतीत पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न राहिला. तसेच त्यांनी केलेले समाज कार्य व कामाविषयीची जागरुकता, तत्परता व कामे लवकरात लवकर पुर्ण

होणेकरीता केलेल्या वारंवार केलेल्या पाठपुराव्यामुळे मिरा भाईंदर शहरातील अनेक विकास कामे, अनेक समस्या मुक्त होण्याच्या दिशेने कार्यरत आहे.

तरी मा. महापौर यांनी त्यांच्या महापौर पदाच्या कालावधीमध्ये शहराच्या विकासाकरीता केलेल्या उत्कृष्ठ कामांबद्दल सभागृहात उपस्थित नगरसेवक/नगरसेविका, पदाधिकारी, अधिकारी /कर्मचारी वर्ग, पत्रकार बंधु/भगिनी यांच्या तर्फे मा. महापौर श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांचे मन:पूर्वक अभिनंदन करुन त्यांच्या पुढील यशस्वी कारर्किर्दीस शुभेच्छा देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. धृवकिशोर पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम ह्या ठिकाणी मी आपणाला विनंती करतो आपल्या माध्यमातून की, ह्या ठिकाणी आपण ऑडिटेरीयम नाट्यगृह बांधलेले आहे आणि ह्या सरकारने लवकरच त्यांच उद्घाटन देखील आपण राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचे शुभहस्ते करणार आहोत. महापौर मॅडम मला सभागृहाला विनंती करायची आहे. ह्या नाट्यगृहाचे नाव डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम नाट्यगृह अस ठेवण्यात आलं आहे. विशेष बाब म्हणून मला आपल्याला विनंती करायची आहे की ह्या ठिकाणी त्या नावाऐवजी गायन सम्राग्नी लता मंगेशकर यांचे नाव त्या नाट्यगृहाला देण्यात यावं अशी मी आपणास आणि सभागृहाला विनंती करतो. महापौर मॅडम आणि दुसर अस आहे की नाट्यगृह तर आता सुरु होईल परंतु त्याचे दर ठरवणे ही आपली शेवटची सभा आहे आणि पुढेही आपल्या इलेक्शनला वेळ आहे म्हणजे हा विषय सभागृहात येणार नाही. महापौर मॅडम आणि म्हणून माझी विनंती आहे प्रशासनाला मा. आयुक्त साहेबांना की आपण त्या नाट्यगृहामध्ये दोन सभागृह आहेत त्या एका सभागृहामध्ये एक झोन आहे आणि मोठ आहे तर त्याचे एक 25 हजार रुपये आणि मोठ्याचे 50 हजार रुपये आणि जे काही लाईट बील येईल तर ते त्यांनी भरावं अशा प्रकारचे महापौर मॅडम माझी ह्या सभागृहाला विनंती आहे की ते रेट फिक्स करावे नाही तर महापौर मॅडम आपण उद्घाटन करु आयुक्त महोदय आणि मग ते रेट फिक्स करणे राहून जाईल. आयुक्त महोदय त्या नावालाही आपण अनुमती द्यावी आणि महापौर मॅडम, आयुक्त महोदय आपणाला विनंती असेल की हे सभागृह ह्या सभागृहाची मुदत 28 तारखेला संपत आहे. परंतु त्या वेळेला ह्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री ह्या कार्यक्रमामध्ये ती वास्तु तिथे मोठ्या दिमाखात तिथे उभी राहिली ह्यात सर्वांचे सहभाग आहे. आयुक्तांचा महापौर मॅडम याचा सर्व सन्मा सदस्यांचा तर महापौर मॅडम आयुक्त महोदय त्या ठिकाणी जो फलक लावण्यात येईल त्या फलकावरती सर्व सन्मा. सदस्यांचे, पदाधिकाऱ्यांचे नाव लावण्यात यावीत. एवढीच मी सभागृहाला आणि आपणास विनंती करतो.

विक्रमप्रताप सिंह :-

महापौर मॅडम अभी यह विषय पे सभागृहनेता दळवी साहबने जो विषय डाला है इसका हम लोग समर्थन करते है निश्चित तौर पे नाट्यगृह महाजनवाडी में जो बनके तैयार है उसमें मिरा भाईंदर के लोग लाडले आमदार मा.श्री. प्रताप सरनाईक साहबने प्रयास करके उन्होंने बिना एक भी रुपया महापालिका का खर्च न करते हुए उन्होंने वास्तु को तैयार कराया है| निश्चित तौर पे उसका नामकरण पहिले पूर्व राष्ट्रपती भारतरत्न श्री. स्व. अब्दुल कलामजी इतना नाम दिया गया था लेकिन कला जगत खेल जगत अलग अलग विषय होता है और यह हमारे जो महापुरुष है उनका हर विषय में ऐक्स्पर्टी अब्दुल कलामजी हमारे देश के बहुत बडे धरोहर थे| निश्चित तौर पे उनका योगदान

भारतवर्ष कभी भुल नही सकता है लेकिन उसीके साथ साथ जो है स्वर कोकीला भारतरत्न लता मंगेशकरजी उनका भी पूरे दुनिया में हमारे भारत का मान उन्होंने बढाया है| निश्चित तौर पे यह नाट्यगृह है तो कही ना कही वो विषय इसपे सुट करता है इसके लिए हमारे आमदार महोदयने पत्र दिया है और हमारे माजी विरोधी पक्षनेता राजु भोईरजी ने भी पत्र दिया है तो निश्चित तौर पे नाट्यगृह का नामकरण स्वर कोकीला भारतरत्न लता मंगेशकरजी के नाम पे होना चाहिए और उसी के ठिक सामने एक ऑलम्पीक साईज का तरणतलाव बनके रेडी है जिसका ओपनींग जो है मौजुदा उपमुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्र फडणवीसजी के हाथो से हो चुका है| उनका नामकरण जो है हमारे भारतरत्न पूर्व राष्ट्रपती अब्दुल कलामजी के नाम पर होना चाहिए ऐसा में प्रस्ताव रखता हूँ| निश्चित तौर पे यह हमारे देश के दोनो धरोधर है दोनो लोगोने भारत का मान बढाया है और हमारे मिरा भाईंदर शहर में ऐसे महापुरुषो का नामकरण सभी जगह पे अगर होगा क्योंकी खेल प्रेमी थे अब्दुल कलामजी जो है निश्चित तौर पे जब ऑलंम्पीक जब वो राष्ट्रपती थे ऑलंम्पीक में हम पदक नही जित पाए थे तो उन्होंने बहुत ही खेद प्रकट किया था और दु:ख प्रकट किया था की हमारे देश में आनेवाले समय में हमारे देश के युवा और खिलाडी अगर आनेवाले समय में मेडल जितेंगे तो हमारे देश के लोगो को बहुत अच्छा लगेगा और देश के युवाओ को प्रेरणा मिलेगा तो निश्चित तौर पे तरणतलाव का नामकरण अब्दुल कलाम होना चाहिए और नाट्यगृह का नामकरण जो है स्वर कोकीला भारतरत्न लता मंगेशकरजी के नाम पे होना चाहिए बहुत बहुत धन्यवाद मेरी यह सुचना है सुचना में इसको अॅड करीए|

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम विषयपटलावर विषय नाही हा विषय त्यांनी मांडला चर्चेसाठी निर्णय तांत्रिक पध्दतीने तो होऊ शकत नाही कारण हा विषय महासभेसमोर आला होता. नामकरणाचा त्याला महासभेने मंजूरी दिलेली आहे. आज गोषवारा नाही कुठलाही विषय नाही. नाट्यगृह एक मोठी वास्तु ह्या शहरामध्ये निर्माण झाली. योग्य निर्णय घेऊन योग्य व्यक्तीचे नाव त्या सभागृहाला देण्यात येत आहे. त्या पूर्ण नाट्यगृहाला देण्यात येत आहे. ए.पी.जे.अब्दुल कलाम हा एक छोटा मोठा व्यक्ती नव्हता. ते नव्हते. अणु वैज्ञानिक न्युक्लियर सायंटिस आणि अशा व्यक्तींबद्दल त्या व्यक्तीचे नाव एक पूर्ण वास्तुला देण्यात आलेले होते आणि ते नाव आज बदलुन कोकिला भारतरत्न लता मंगेशकरजी त्यांचे योगदान त्या क्षेत्रामध्ये त्यांचे असेल संगीत क्षेत्रामध्ये असला तरी ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे योगदान ह्या पूर्ण देशाला आहे. त्यांचे पूर्ण ह्या देशामध्ये देशाचे नाव पूर्ण विश्वामध्ये पसरले गेले त्याचे नाव आता आपल्याला देशाचे नव त्यांनी वाढवले आणि अशा व्यक्तींच्या नावाला बदलुन ठिक आहे आमचा लताजींच्या बद्दल दुमत नाही दुसऱ्या वास्तुंना तुम्हाला देता येईल एक तरणतलावाला नाव द्यायचे किती मोठ्या व्यक्तींचं हा विचार आपण कसा करु शकतो. हा विचार करणेच योग्य नाही म्हणून आमचा ह्या विषयाला ठाम सक्तीचा विरोध आहे. असे करु नये आणि आयुक्त महोदय मी आपणांस विनंती करेल की अशाप्रकारे कुठलाही बदल आपण घडवू नये. हे नाव महासभेने मंजूर केलेले नाव विषयपटलावर विषय घेऊन हा विषय मंजूरी देण्यात आली होती सर्वानुमते आज त्याच्यात बदल करता येणार नाही माझी आयुक्तांना आणि तुम्हाला कळकळीची विनंती आहे ह्या विषयाबाबत ह्या वास्तुचे नाव बदलण्याची आमचा सक्तीचा विरोध आहे ह्या विषयावर.

मर्लिन डिसा :-

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने बोलते हे जे ए.पी.जे अब्दुल कलाम तुम्ही पण एक शिक्षिका आहात मी पण एक शिक्षिका आहे आणि आपणाला माहित आहे त्यांचे महत्व काय आहे. आता पण जेव्हा विद्यार्थी येतात आई वडील येतात की कुठल्या शाळेत मुलांना टाकायचं तर मी म्हणते तुम्ही त्यांची नोकरी वगैरे काऊंसिलींग करते त्यांना एक्झाम्पल देते आणि डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलामचे एक्झाम्पल देते. ते एका रुलर एरियामध्ये गावात सरकारी शाळेत शिकुन देशाचे सर्वात मोठे

पद त्यांना मिळाले. प्रेसिडंट ऑफ इंडिया होते. मिसाईल मॅन ऑफ इंडिया. न्युक्लियर सायंटिस मिसाईल मॅन ऑफ इंडिया त्यांनी मिसाईलची इनव्हेंशनल केली आणि हे एवढे मोठे सायंटिस त्यांना असे कसे आपण सगळ्या महासभेने नाव दिल्यानंतर आमचा हा इनसल्ट आहे आम्ही डिसीजन घेतलेले आम्ही परत चेंज करायचे. धिस इज नॉट राईट. माझी कळकळीची विनंती आहे मॅडम तुम्ही ह्याच्यावर जरा लक्ष देऊन विचार करुन निर्णय घ्यावा.

मा. महापौर :-

विषयपत्रिकेवरचे विषय घ्या. नंतर आपण ह्या विषयावर चर्चा करु.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम सत्कारमूर्ती जे आहेत त्यांचे सत्कार करुन घ्या.

मा. महापौर :-

सत्कारमुर्ती त्यांना पाठवा ते 3 तासापासून थांबलेले आहेत.

नगरसचिव :-

डॉ. सुभाष पाल ह्यांनी इंग्लंडमधील बडमेनराम येथे 28 जुलै 2022 ते 8 ऑगस्ट 2022 ह्या दरम्यान 22 वी राष्ट्रकुल क्रिडा स्पर्धा 2022 मध्ये आयोजित करण्यात आलेली होती त्यामध्ये एकुण 72 देशांनी भाग घेतलेला होता. त्यामध्ये विशिष्ठ बॅटमिंटन, बॉक्सींग, वजन उचल, कुस्ती, ॲथलेटीक्स अशा विविध खेळांचा समावेश होता. ह्या खेळामध्ये भारत देशाला 22 सुवर्ण, 16 रौप्य व 23 कास्य असे एकूण 61 विविध पदके जिंकण्याकरिता महत्वाची उल्लेखनिय कामगिरी ह्यांनी केलेली आहे. मिरा भाईंदर शहराचे नाव लौकीक केलेले आहे. त्यामुळे त्यांची कामगिरी कौतुकास्पद आहे. डॉ. सुभाष पाल हे प्रशिक्षक आहेत आणि ह्यांच्या हाताखाली ज्या खेळाडुंनी मोठ्या प्रमाणामध्ये सुवर्ण, रौप्य आणि कास्य पदक मिळविलेली आहेत. 2. श्री. जे.व्ही.आर डेव्हीड अचमकंदन वय वर्ष 59 ह्यांनी गेल्या 9 वर्षापासून अनेक मॅरेथॉन स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून मिरा भाईंदर शहराचे नाव लौकीक केलेले आहे. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत 7 पूर्ण मॅरेथॉन, 30 अर्धमॅरेथॉन आणि 50 कि.मी. रन अशा अनेक मॅरेथॉन स्पर्धामध्ये सहभाग नोंदवून असंख्य पदके जिंकून आपले शहराचे नाव लौकीक केलेले आहे. हे जेष्ठ नागरिक असून ह्या त्यांच्या उल्लेखनिय कामगिरीची दखल आपण घेऊन त्यांचा सन्मान ह्या ठिकाणी महापौर मॅडम करीत आहेत. 3. एस.के. वय वर्ष 18 यांनी गेल्या 3 वर्षापासून अनेक पावर लिफ्टिंग स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून मिरा भाईंदर शहराचे नाव लौकीक केलेले आहे. त्यांच्या अस्तागृहाच्या 10 पेक्षा अधिक जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय प्रतिनिधीत्व केलेले आहे. ज्युनिअर 66 वजनी गटाचा माध्यमातून मुंबई उपनगर जिल्हास्पर्धेत सुवर्णपदक, महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेत कास्य पदक चेन्नई येथे झालेल्या राष्ट्रीय वेटलिफ्ट स्पर्धेकरिता निवड झालेली आहे. त्यांच्या कामगीरीची दखल घेऊन महापौर मॅडम ह्याठिकाणी त्यांचा सत्कार करीत आहेत.

मा. महापौर :-

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम मगाशी जो नाट्यगृहाचा विषय झाला त्यावेळी मी परवानगी मागितली होती.

मा. महापौर :-

आता विषय घ्या ना..

अनिल सावंत :-

महासभेचे आपले महापालिकेचे धोरण ठरलेले आहे. एकदा दिलेले नाव बदलायचे नाही हे आपले धोरण ठरलेले आहे त्यानंतर मिरा भाईंदर शहरामध्ये संगीत विद्यालय होणार आहे आणि त्याला ऑलरेडी आपण गानसम्राग्नी लता मंगेशकर यांचे नाव देणार आहोत आणि ए.पी.जे अब्दुल

कलाम फक्त शास्त्रज्ञ नव्हते तर ते चांगले लेखक होते आणि लेखन हा जो विषय आहे तो नाट्याशी संबंधित आहे त्यामुळे त्यांचेच नाव त्या नाट्यगृहाला संयुक्तीक आहे ते बदलण्यात येऊ नये ही आमची स्पष्ट भुमिका आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे. त्यांनी मुद्दा मांडला तुमचा विरोध नोंदवला. विषयाला सुरुवात करा.

प्रकरण क्र. -- :-

नाट्यगृहाचे नामकरण करणेबाबत.

ठराव क्र. 49 :-

मिरा भाईंदर शहरातील महाजन वाडी गावठण येथे शहरातील नाट्य रसिक प्रेक्षक आणि कलाकार यांच्या सोयीकरीता ३०० आणि ९०० असे एकूण १२०० आसन क्षमता असणारे २ सुसज्ज नाट्यगृहाचे निर्माण पूर्ण झाले असुन सदर नाट्यगृहास "डॉ. ए.पी.जी. अब्दुल कलाम" यांचे नाव देण्यात आलेले होते.

परंतु मिरा भाईंदर शहरामध्ये प्रथमच निर्माण झालेल्या या सुसज्ज नाट्यगृहास एक विशेष बाब म्हणून **"भारतरत्न गानसम्राज्ञी स्व. लता मंगेशकर सभागृह"** असे नाव देण्यात यावे अशी मागणी शहरातील नाट्यरसिक, कलावंत आणि प्रेक्षक यांनी केली आहे. त्याअनुषंगाने सदर नाट्यगृहास **"भारतरत्न गानसम्राज्ञी स्व. लता मंगेशकर सभागृह"** असे नाव देण्यात यावे असे मी सभागृहातील उपस्थित सदस्यांना विनंती करीत आहे.

तद्वतच या नाट्यगृहाच्या उद्घाटना प्रसंगी महापालिकेतील सर्व सदस्यांची नावे असलेली पाटी नाट्यगृहाच्या दर्शनी भागामध्ये लावण्यात यावी. तसेच सदर नाट्यगृहामध्ये विकसीत केलेल्या छोट्या सभागृहाचे रक्कम रु.२५०००/- आणि मोठ्या सभागृहाचे रक्कम रु.५००००/- इतके भाडे आकारून वापरण्यात आलेले लाईट युनिट प्रमाणे इलेक्ट्रीसिटी कंपनी आकारत असलेले दर संबंधीतांकडुन घेण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. धृवकिशोर पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 44, दि. 29/04/2022, दि. 09/05/2022 (दि. 29/04/2022 रोजीची तहकुब सभा) व दि. 17/05/2022 (दि. 29/04/2022 व दि. 09/05/2022 रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

प्रशांत दळवी :-

दि. 29/04/2022, दि. 09/05/2022 (दि. 29/04/2022 रोजीची तहकुब सभा) व दि. 17/05/2022 (दि. 29/04/2022 व दि. 09/05/2022 रोजींच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

धृवकिशोर पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

इतिवृत्तांत मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. 44 :-

प्रकरण क्र. 44, दि. 29/04/2022, दि. 09/05/2022 (दि. 29/04/2022 रोजीची तहकुब सभा) व दि. 17/05/2022 (दि. 29/04/2022 व दि. 09/05/2022 रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. 50 :-

दि. 29/04/2022, दि. 09/05/2022 (दि. 29/04/2022 रोजीची तहकुब सभा) व दि. 17/05/2022 (दि. 29/04/2022 व दि. 09/05/2022 रोजींच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी       अनुमोदक :- श्री. धृवकिशोर पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 45, बारवी धरण प्रकल्पासंबंधीतांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने आस्थापनेवर समावून घेणेबाबत.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम ही विशेष बाब आहे आज प्रभाग क्र. 21 मौजे पेणकरपाडा सर्व्हे क्र. 204 व 206 पैकी विकास यांचेकडून आर.जी. जागा रहिवाशांकरिता मोकळी करण्यात यावी म्हणून महापौर मॅडम गेल्या दोन दिवसांपासून म्हणजे जी लोक ह्या सभागृहाच्या विरोधात प्रशासनाच्या विरोधात बॉडीच्या विरोधात इकडे आंदोलन करत होती विना परवानगी त्यांनी ह्या सभागृहामध्ये तो माहोल केला होता. महापौर मॅडम त्यांचे ह्या ठिकाणी मैदानाची जागा त्याठिकाणी त्यांना इन्क्रोचमेंट केलेले आहे आणि त्याठिकाणी महापौर मॅडम मी सोसायटीचे लोक गेले 2 दिवसांपासून त्या ठिकाणी उपोषणाला बसलेले आहेत. महापौर मॅडम आणि म्हणून माझी विनंती असेल की ह्यावरती प्रशासनाने काय नेमका निर्णय घेतलेला आहे?

मा. महापौर :-

आता आयुक्त महोदय सध्या जागेवर नाहीत. त्यामुळे आपण हा विषय पहिला संपवून घेऊ नंतर तुम्ही विषय मांडा.

धृवकिशोर पाटील :-

उपरोक्त गोषवाऱ्यानुसार बारवी धरणाची उंची वाढल्यामुळे प्रकल्प बाधित होणाऱ्या 1163 कुटूंबातील एका व्यक्तीस याप्रमाणे एकूण 1163 लोकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये विहित पध्दतीने सामावून घेण्याबाबत दि.18/09/2017 च्या शासन निर्णयानूसार 75 द.ल.लि. प्रती दिन एवढ्या वाढीव पाणी पुरवठ्यानुसार येणारी एकूण 15% नुसार 179 एवढी पदे मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर तातडीने नेमणूक करणेकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-03 व वर्ग-04 संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या रिक्त असलेल्या पदांवर मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडून बारवी प्रकल्प बाधितांची अंतिम यादी प्राप्त झाल्यानंतर 179 प्रकल्प बाधितांना मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेणेकरीता मा. महासभा दि.14/08/2019, ठराव क्र.59 अन्वये मान्यता दिलेली आहे.

मा. प्रधान सचिव उद्योग उर्जा व कामगार विभाग यांनी बारवी धरणाची उंची वाढल्यामुळे अतिरीक्त पाणी साठ्यापैकी प्रस्तावित वाटपाची 15% नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेत प्रकल्प बाधितांची पद संख्या 210 झाल्याबाबत दि.20/12/2020 रोजी कळविलेले आहे.

परंतु मा. जिल्हाधिकारी यांचेकडून फक्त 95 प्रकल्प बाधितांची यादी प्राप्त झालेली असुन 179 प्रकल्प बाधितांना आस्थापनेवर कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेणेकरीता मा. महासभेत ठराव मंजुर करण्यात आला आहे.

मिरा भाईंदर शहराकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरीक्त 75 द.ल.लि. पाणी पुरवठा मंजुर असुन सद्यस्थितीत मंजुर पाणी पुरवठा शहरास होत आहे. मिरा भाईंदर शहरास पाण्याची आवश्यकता पाहता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मंजुर कोट्यानुसार पूर्ण पाणी उपलब्ध करुन घेवून मा. जिल्हाधिकारी यांचेकडून उर्वरीत प्रकल्प बाधितांची अंतिम यादी प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत 31 प्रकल्प बाधितांना महापालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी सामावून घेण्याकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे संयुक्तीक होईल. त्यामुळे मंजुर कोट्यानुसार पाणी उपलब्ध झाल्यानंतर व मा. जिल्हाधिकारी यांचेकडून प्रकल्प बाधितांची अंतिम यादी प्राप्त झाल्यानंतर मा. महासभेत आर्थिक व प्रशासकीय मंजुरीकरीता यादी सादर करावी असा मी ठराव मांडत आहे.

प्रशांत दळवी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. 45 :-

**बारवी धरण प्रकल्पासंबंधीतांना पाण्याच्या वापराच्या समन्यायी पध्दतीने आस्थापनेवर समावून घेणेबाबत.**

ठराव क्र. 51 :-

उपरोक्त गोषवाऱ्यानुसार बारवी धरणाची उंची वाढल्यामुळे प्रकल्प बाधित होणाऱ्या 1163 कुटूंबातील एका व्यक्तीस याप्रमाणे एकूण 1163 लोकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये विहित पध्दतीने सामावून घेण्याबाबत दि.18/09/2017 च्या शासन निर्णयानूसार 75 द.ल.लि. प्रती दिन एवढ्या वाढीव पाणी पुरवठ्यानुसार येणारी एकुण 15% नुसार 179 एवढी पदे मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर तातडीने नेमणूक करणेकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग-03 व वर्ग-04 संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या रिक्त असलेल्या पदांवर मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडून बारवी प्रकल्प बाधितांची अंतिम यादी प्राप्त झाल्यानंतर 179 प्रकल्प बाधितांना मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेणेकरीता मा. महासभा दि.14/08/2019, ठराव क्र.59 अन्वये मान्यता दिलेली आहे.

मा. प्रधान सचिव उद्योग उर्जा व कामगार विभाग यांनी बारवी धरणाची उंची वाढल्यामुळे अतिरीक्त पाणी साठ्यापैकी प्रस्तावित वाटपाची 15% नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेत प्रकल्प बाधितांची पद संख्या 210 झाल्याबाबत दि.20/12/2020 रोजी कळविलेले आहे.

परंतु मा. जिल्हाधिकारी यांचेकडून फक्त 95 प्रकल्प बाधितांची यादी प्राप्त झालेली असुन 179 प्रकल्प बाधितांना आस्थापनेवर कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेणेकरीता मा. महासभेत ठराव मंजुर करण्यात आला आहे.

मिरा भाईंदर शहराकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरीक्त 75 द.ल.लि. पाणी पुरवठा मंजुर असुन सद्यस्थितीत मंजुर पाणी पुरवठा शहरास होत आहे. मिरा भाईंदर शहरास पाण्याची आवश्यकता पाहता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मंजुर कोट्यानुसार पूर्ण पाणी उपलब्ध करुन घेवून मा. जिल्हाधिकारी यांचेकडून उर्वरीत प्रकल्प बाधितांची अंतिम यादी प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत 31 प्रकल्प बाधितांना महापालिका आस्थापनेवर कायमस्वरुपी सामावून घेण्याकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे संयुक्तीक होईल. त्यामुळे मंजुर कोट्यानुसार पाणी

उपलब्ध झाल्यानंतर व मा. जिल्हाधिकारी यांचेकडून प्रकल्प बाधितांची अंतिम यादी प्राप्त झाल्यानंतर मा. महासभेत आर्थिक व प्रशासकीय मंजुरीकरीता यादी सादर करावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 46, मिरा भाईंदर महानगरपालिकेत वाहने वाहनचालकासह इंधनासह संपूर्ण सेवा भाड्याने घेणेकामी निविदा मागविणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रशांत दळवी :-

सन 2022-23 या आर्थिक वर्षात खाजगी वाहने वाहन चालकासह, इंधनासह संपूर्ण सेवा भाडेतत्वावर घेणेकरीता लेखाशिर्षकातील तरतुद संपल्याने मे. सीताराम ट्रॅव्हल्स यांस मागील उर्वरीत देयके प्रदान करणेकामी रु.2 कोटी रुपये व पाच कोटी रुपयांचे वाहन विभागाच्या उपलब्ध लेखाशिर्षकातून पुर्न:विनीयोजन करुन निविदा मागविणेस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

धृवकिशोर पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. 46 :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेत वाहने वाहनचालकासह इंधनासह संपूर्ण सेवा भाड्याने घेणेकामी निविदा मागविणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. 52 :-

सन 2022-23 या आर्थिक वर्षात खाजगी वाहने वाहन चालकासह, इंधनासह संपूर्ण सेवा भाडेतत्वावर घेणेकरीता लेखाशिर्षकातील तरतुद संपल्याने मे. सीताराम ट्रॅव्हल्स यांस मागील उर्वरीत देयके प्रदान करणेकामी रु.2 कोटी रुपये व पाच कोटी रुपयांचे वाहन विभागाच्या उपलब्ध लेखाशिर्षकातून पुर्न:विनीयोजन करुन निविदा मागविणेस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. धृवकिशोर पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

जुबेर इनामदार :-

सभागृहनेते पुर्नविनियोजन कुठून आले?

धृवकिशोर पाटील :-

गोषवाऱ्यात नमुद आहे. महापौर मॅडम खाजगी गाड्या भाड्याने घेणेकरिता वाढीव रक्कम 5 कोटी इतक्या तरतुदीस व नव्याने वार्षिक निविदा मागविण्याकरिता मंजूरी मागितलेली आहे. म्हणजे

काय तरतूद संपलेली आहे आणि ती तरतूद करायची आहे. ॲक्च्युअली ह्यांनी पुर्नविनियोजन टाकले पाहिजे. बहुतेक त्यांनी ते टाकले नाही आम्ही ते टाकून दिले.

जुबेर इनामदार :-

पण पुर्नविनियोजन करणार असले तर कुठून करणार कुठल्या हेड मधून महासभेचा अधिकार आहे कुठल्या हेडमधून कुठे करणार पुर्नविनियोजन ते सांगा 50 लाखाच्यावरती महासभेचा अधिकार आहे.

धृवकिशोर पाटील :-

वाहन विभागाच्या उपलब्ध तरतुदीमधून आपल्याला याच्यात पुर्नविनियोजन करायचे आहे.

जुबेर इनामदार :-

कुठल्या विभागातून?

धृवकिशोर पाटील :-

वाहन विभाग.

जुबेर इनामदार :-

प्रशासनाला सांगु द्या. प्रशासनाला माहिती देऊ द्या.

मा. महापौर :-

उपायुक्त गायकवाड येत आहेत तोपर्यंत पुढचा विषय घ्या.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम ह्याच्यामध्ये 2 करोड रुपये मागची तरतूद दिलेली आहे. मग मागची प्रोव्हिजन गेली कुठे मागची तरतूद कुठे गेली?

जुबेर इनामदार :-

बजेट तुम्ही तयार करता अर्थसंकल्प तुम्ही तयार करता सभापती तुमचा महासभेमध्ये बहुमताने ठराव तुम्ही करता डिसेंबर आला नाही आणि पुर्नविनियोजनचे विषय आले.

मा. महापौर :-

गायकवाड साहेब येत आहेत तोपर्यंत दुसरा विषय घ्या.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम डिसेंबरच्या आधी पुर्नविनियोजन कस शक्य आहे.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 47, भाईंदर (पूर्व) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे. (खाजगी टँकरचा प्रतिफेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे.) कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रशांत दळवी :-

उपरोक्त गोषवाऱ्यानुसार भाईंदर (पु.) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी वार्षिक अंदाजित खर्च रक्कम रु.2,00,00,000/- इतका खर्च अपेक्षित असुन सदर खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

धृवकिशोर पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. 47 :-

भाईंदर (पूर्व) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे. (खाजगी टँकरचा प्रतिफेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे.) कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. 53 :-

उपरोक्त गोषवाऱ्यानुसार भाईंदर (पु.) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी वार्षिक अंदाजित खर्च रक्कम रु.2,00,00,000/- इतका खर्च अपेक्षित असुन सदर खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदक :- श्री. धृवकिशोर पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम एक अभिनंदनाचा ठराव आहे. महापौर मॅडम गेल्या 5 वर्षामध्ये ह्या ठिकाणी महापालिकेमधली सभागृहामध्ये असलेले सर्व सन्मा. नगरसेवक, सर्व सन्मा. सदस्य महापौर आपण ही नागरिकांमध्ये लोकप्रिय असलेल्या असे गोरगरिबांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या श्रीम. ज्योत्स्ना ताई हसनाळे मा. महापौर यांची दि. 26.02.2020 रोजी महापौर पदी विराजमान झाल्या. (अभिनंदन ठराव टाईप करणे) अशा प्रकारची कामे ह्या ठिकाणी महापौर आणि उपमहापौर आयुक्तांच्या माध्यमातून ह्या ठिकाणी करण्यात आले. वेळोवेळी ह्या शहराला महापौर मॅडम ज्या ज्या वेळेला जनहिताची कामे ह्या सभागृहातून झाली त्या त्या वेळेला सर्वच लोकप्रतिनिधींनी आपली जी काम निडरपणे ह्या ठिकाणी केलेली आहेत आणि म्हणून महापौर मॅडम ह्या ठिकाणी आपले अभिनंदन करावेसे वाटते की ह्या शैक्षणिक दर्जा वाढवला. परिवहन विभागाचा दर्जा आपण वाढविलेला आहे. उद्यानामध्ये पशुसंवर्धन विभाग आहे त्यातही ह्या आस्थापना विभागाने काम केलेली आहेत आणि म्हणून महापौर मॅडम आपण केलेल्या कालावधीत शहराच्या विकासाचा उत्कृष्ठ कामाबद्दल सभागृहात उपस्थित नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार बंधुभगिनी तसेच ह्या ठिकाणचे कार्यसम्राट मा. आयुक्त दिलीपजी ढोले यांचे देखील मी मनपूर्वक अभिनंदन करतो व पुढील यशस्वी कारकिर्दीत शुभेच्छा देतो. महापौर मॅडम हा अभिनंदनाचा ठराव ह्या ठिकाणी करत असताना ह्या ठिकाणी सभागृहनेता म्हणून जे जबाबदारी ह्या ठिकाणी पक्षाने मला दिली त्या सर्व नेत्यांचे मी ह्या ठिकाणी आभार मानलेलेच आहेत. परंतु हे काम करत असताना महापौर मॅडम ह्या प्रशासनाने आयुक्त महोदय आपण ही उपमहापौर बॉडीचे सर्व आणिसभागृहामध्ये असलेले सर्व सन्मा. नगरसेवक, नगरसेविका यांचे प्रत्येक वेळी मला मार्गदर्शन मिळालेले आहे आणि प्रत्येक वेळेला ह्यांीन सपोर्ट केलेला आहे आणि शहरातील काम करत असताना महापौर मॅडम काही अनावधानाने चुका होत असतात. आणि त्याबद्दलही मी ह्या ठिकाणी दिलगीरी व्यक्त करतो. परंतु प्रशासनाने ह्या ठिकाणी गेल्या 5 वर्षाच्या कालखंडामध्ये मग प्रशासनाचे अधिकारी असतील, पदाधिकारी असतील त्या ठिकाणी महापौर मॅडम स्वच्छता जे काही निरिक्षक आहेत ह्यांनी कोरोना काळामध्ये मग ते नर्सेस असतील डॉक्टर असतील त्यांनी उत्कृष्ठपणे काम केलीत आणि त्यामध्ये महापौर मॅडम आपण दोन वर्ष प्रत्यक्ष सभा न घेता त्याठिकाणी ऑनलाईन सभा आपण ह्या सभागृहामध्ये परंतु जनतेची कुठलीही काम आपण त्या ठिकाणी कमी पडू दिली नाहीत. सक्षमपणे आपण त्याठिकाणी उभे राहिलो आणि म्हणून महापौर मॅडम आपलं आणि मा. आयुक्त साहेबांचे आभार मानू तेवढे कमी आहेत. म्हणून मी पुन्हा

एकदा सर्वांचे आभार मानतो आणि त्याठिकाणी पुन:श्च एकदा अनावधानाने माझ्याकडून काही चुक झाली असेल तर मी सर्वांची दिलगीरी व्यक्त करतो. आणि माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम मिरा भाईंदर शहर 2017 मध्ये ह्या निवडणूका झाल्यानंतर ह्या ठिकाणी एक नविन बॉडी पहिल्या टर्ममध्ये आदरणीय डिंम्पल मेहता मॅडम महापौर होत्या त्यानंतर अडीच वर्षांनी आपण झालात. दोन वषा्रचा कार्यकाल कोविडमध्ये गेला. मुंबईचे नाविण्यशहर असल्यामुळे लोकांच्या अपेक्षा सुध्दा फार वाढत आहेत. आणि मुंबई किंवा ठाणेशी आपण कम्पॅरीजन करु शकत नाही कारण त्यांचे बजेट मोठ आहे. आपल्या येथे सोर्स ऑफ इनकम फार लिमिटेड आहे. पण लोकांच्या अपेक्षा मुंबईच्या बाजुला, ठाण्याच्या बाजुला हे शहर असल्यामुळे लोकांच्या अपेक्षा वाढत आहेत. तरी सुध्दा ह्या टर्ममध्ये आपण बघितले असेल तर बहुतेक सर्व पक्षीय नगरसेवक हे नविन आहेत. तरी सुध्दा ह्या शहराच्या हितासाठी एक चांगल्याप्रकारे सर्व लोकप्रतिनिधींनी काम केलेले आहे आपल्या प्रभागाच्या माध्यमातून शहराच्या माध्यमातून मोठा एक प्रोजेक्ट मेट्रो सारखा एक चांगला प्रोजेक्ट ह्या शहरामध्ये येऊ घातलेला आहे. काही दिवसांनी आपले 200 एम.एल.डी. पाणी ह्या शहराला मिळेल आणि पुढच्या 50 वर्षामध्ये ह्या शहरामध्ये पाण्याची जी समस्या आहे आता सुध्दा चांगल्या प्रकारे पाण्याची समस्या हँडल केली जाते. कुठून काही विशेष तक्रार येत नाही. कोविडच्या काळामध्ये सुध्दा प्रशासनाने विशेषत: सफाई कामगार वगैरे असतील त्यांनी कधीही असे म्हटले नाही की एक दिवस हा कचरा उचलायचा त्यांनी ठेवला नाही आणि इतर महापालिकेच्या तुलनेने आपल्या महापालिकेने उत्कृष्ठ अस काम केलं शेवटी तर वसई विरार वसु देत, नालासोपारा असु दे, ठाणे जिल्हा असु देत इथुन पेशंटचे फोन यायचे की आम्हाला ह्या ठिकाणी रिलेटीव्हचे फोन यायचे की तिथे जागा अव्हेलेबल असेल तर सांगा. प्रायव्हेट हॉस्पीटलमध्ये असलेले पेशंट टेंभा हॉस्पीटलमध्ये आम्हाला शिफ्ट करा म्हणून मागे लागायचे अशा प्रकारे एक चांगले काम केलेले आहे. लोकप्रतिनिधींचे सुध्दा त्यामध्ये सहभाग आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन ह्या एकाच गाडीची दोन चाक आहेत. ती जर बॅलेन्समध्ये चालत नसतील तर ह्या शहराचा विकास होऊ शकत नाही. दळवी साहेबांनी सुध्दा आयुक्त म्हणून एक चांगली छाप ह्या शहराच्या हितामध्ये भरपूर चांगले आणि प्रशासनाच्या हितामध्ये सुध्दा तसेच आपले पालिकेतील अधिकारी शिवाय त्यांनी आणलेले बाहेरील मग ते गायकवाड साहेब असतील रवी पवार असतील, संजय शिंदे साहेब असतील हे सगळ्यांनी एवढे उत्कृष्ठ आणि चांगले काम केलेले आहे. गायकवाड साहेब असतील त्याला एक कंट्रोलिंग बॉडी सेनापती जेव्हा चांगला असेल तर सर्व व्यवस्थित लावतात. तसे आमचे ढोले साहेब आहेत. त्यांना सुध्दा ह्या शहराबद्दल कळकळ आहे. ह्या शहरावर लक्ष त्यांचे आहे. सर्व सदस्यांना ज्यांनी एकमेकांना सांभाळून घेतलं कधी कधी आमचे वादविवाद झाले मनात काही नसतं 2007 च्या बॉडीमध्ये तर इतके महान महान सगळे होते आम्ही इथे भांडायचे आणि सभागृहाच्याबाहेर गेलो की प्रफुल्ल पाटील सारखे सुध्दा बोलत होते. आमच्या विरोधात बोलत होतो तर ते बोलले चांगले बोललास म्हणजे ही आपली संस्कृती आहे. ह्या मिरा भाईंदर शहराची ही संस्कृती आहे तर सर्वांचे आपले सुध्दा माजी महापौर आहेत त्यांचे सुध्दा अभिनंदन करतो आणि ह्या शहराला ह्यापूढे येणारी बॉडी सुध्दा ह्यापूढे येणारे अधिकारी सुध्दा पदाधिकारी सुध्दा चांगले मिळावेत आणि ह्या शहराचा विकास व्हावा एवढीच अपेक्षा करतो दोन शब्द संपवतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

रिटा शहा :-

महापौर मॅडम आपले 5 वर्ष गेली त्या आपल्या पहिल्या 5 वर्षामध्ये अडीच वर्ष माजी महापौर डिम्पल मेहताजी त्यांनीही खुप ह्या शहरासाठी मेहनत घेतली सुर्या धरणाचे उद्घाटन असु देत मेट्रोचे असु देत अशी खुप उल्लेखनीय कार्य केले आहे त्यांचे ही मी अभिनंदन करते. जेव्हा महिला

बालकल्याण सभापती होते तेव्हा ही मी नगरसेवक नव्हती. तेव्हाही त्यांनी खुप कार्य केले होते. त्यांच्याकडे मी नेहमी जायची त्यांनी माझी सर्व काम करुन दिली. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन व्यक्त करते. त्याचप्रमाणे ह्या सभागृहाला सभागृहनेता म्हणून प्रशांत दळवी साहेबांनी ह्या सभागृहाला बांधून ठेवून जे कार्य केले त्यांचे ही मी अभिनंदन व्यक्त करते. त्याच्याही व्यतिरिक्त जाऊन प्रशासनाचे मी मनापासून अभिनंदन करते पहिला बालाजी खतगावकर साहेब ते कमिशनर म्हणून इथे अडीच वर्ष होते. त्यांचे मी मनापासून अभिनंदन करते आणि श्री. दिलीप ढोले साहेब यांनी मी कळकळीने अभिनंदन करणार कारण वॉक विथ कमिशनर हा नविन पाया त्यांनी आणला. इथले आमचे जे अधिकारी वर्ग इकडे काम नाही करायचे असे नाही साहेब ते नेहमी करायचे परंतु सकाळी 6 वाजता आपण जे चालून ज्या गल्ल्या गल्ल्या आमचे मिरा भाईंदर महापालिकेचे आपण बघितल्या तिकडे जाऊन तुम्ही काम केली जिथे काम थांबलेली आहेत तिथे काम सुरु केली आणि 15 ऑगस्टला जे आमचे नरेंद्र मोदी पंतप्रधान साहेबांचे आवाहन होते पूर्ण देशाला की हर घर झेंडा आणि जे आपण पूर्ण मिरा भाईंदरला सजवले आणि आपण जे पाददर्शक केले ते दृष्य आपल्या ॲम्ब्युलन्स, आपल्या बस आपण जे वातावरण निर्मित केले त्याच्याबद्दल मी तुमचे मनापासून धन्यवाद करते. त्याचप्रमाणे टेंभा हॉस्पीटलमध्ये कोरोना टाईमच्या वेळी आपण ज्या सुविधा आणि जे काही कळकळीची मेहनम केली त्यांचेही मी मनापासून अभिनंदन करते. हसमुख गेहलोत साहेब उपमहापौर त्यांचे नाव जस आहे तसे ते नेहमी हसुन कार्य करुन द्यायचे त्यांचेही मी अभिनंदन करते. आता जे आपले महापौर आपले जे अडीच वर्ष संपलेले आहेत तुम्ही नेहमी आम्हाला प्राधान्य दिले आम्हाला बोलायची संधी दिली आमचे विषय सर्व कळकळीने मांडलेत ते तुम्ही ऐकून घेतले त्याबद्दल मी तुमचे मनापासून अभिनंदन करते. मी नक्कीच इकडे काही ऑफीसरचे नाव घेणार शिवाजी बारकुंड साहेब ते आता आपल्यामध्ये नाही ते सेवानिवृत्त झालेले आहेत, बेलवटे साहेब दिपक खांबित साहेब, सुरेश वाकोडे साहेब हे जेवढी लोक क्लास 1 आणि क्लास 2 ची लोक अधिकारी वर्ग त्यांचे मी मनापासून धन्यवाद करते. आणि ह्या प्रेक्षक गॅलरीमध्ये बसणारे आपले जेवढे पत्रकार बंधु आहेत मिडीया चालवतात ह्या लोकांनी आपल्या ह्या सभागृहामध्ये होणाऱ्या सर्व घडामोडींचे पारदर्शक लोकांकडे गेलं त्या पत्रकारांचे पण मिडीयाचे पण मी अभिनंदन व्यक्त करते. सभागृहामध्ये बसलेले सर्व माझे नगरसेवक वगैरे सर्वांचे मी अभिनंदन करते आणि खास ह्या शहरामध्ये मेट्रो, सुर्या डॅमचे काम, कॉंक्रीट रोड ह्या सर्व कल्पना आमच्या नगरसेवकांना दिली अशी माजी आमदार नरेंद्र मेहताजी ह्या महाराष्ट्राचे कार्यसम्राट उपमुख्यमंत्री आणि पहिले जे होते विरोधी पक्षनेता देवेंद्र फडणवीस साहेब आणि हल्लीचे मुख्यमंत्री श्री. शिंदे साहेब ह्या सर्वांचे मी मनपूर्वक अभिनंदन करते आणि माझे दोन शब्द संपवते.

मनोज दुबे :-

महापौर मॅडम अभी धन्यवाद प्रस्ताव दे रहे है शहर का एक लडका कल से उपोषण पे बैठा हुआ है सार्वजनकि काम के लिए जो की आर.जी. किसीने डेव्हलप की मतलब उनका कब्जा किया हुआ है वो खाली नही कर रहा है हमने प्रशासन से स्थानिक नगरसेवक बारबार पत्रव्यवहार किए है उसपे कोई कारवाई नही हो रही है और कलसे लडका उपोषण पे बैठा है अभी तक कोई प्रशासन के तौर से गया नही है उसका तबीयत भी ठिक नही है में चाहूँगा प्रशासन उसका खुलासा करे|

मर्लिन डिसा :-

महापौर मॅडम मी गेल्या आठवड्यापासून आमचे चिल्ड्रन केअर जो आहे कनाकीयाच्या जवळ तिथे मी भेट देत होती आणि त्यांना काहीतरी ब्लॉकेज आहेत तुमचे अभिनंदन पण करायचे आहे अगोदर हे ऐकून घ्या आणि तिथे काल त्यांचे एस.टी.पी. कनेक्शन वगैरे प्रॉपर्टी कनेक्शन चेक केले मग मी एस.टी.पी. प्लांटला तिकडे गेली कनाकीयाला आणि तिथे एवढा वास येतो मॅडम. आता अंकुर आश्रमचे प्रॉपर्टी बील मी बघितले अलमोस्ट 28,000/- एस.टी.पी. फॅसिलीटी टॅक्स भरत आहेत आणि तरीही त्यांना एवढा त्रास 15-20 हजार वेगळे खर्च त्यांना करावे लागले त्यांना सगळे चॉकअप ब्लॉक

ड्रेनेज ब्लॉक होते 4-5 महिन्यानंतर परत त्यांना करायची संधी आली आणि तिकडील त्या परिसरातील लोक कसा तो वास टॅलरीट करत असतील तो तुम्ही समजून घ्या. टॅक्स पेपर्सला एवढा त्यांचा आरोग्याला धोका आहे. तिथे मुलं आहेत सिनिअर सिटीझन आहेत. टॅक्स भरून त्यांना जर ही प्रदुषित हवा मिळत असेल तर हे बरोबर नाही म्हणून मी काय बोलते तिकडे मी चेक केल 8 वोटर्स आहेत पण फक्त तिकडे तीन चाळ आहेत आयुक्त साहेब ते जरा बघुन घ्या.

मा. महापौर :-

आयुक्त साहेब सन्मा. सदस्या जे बोलले ते पाहून घ्या आणि दुबेजी यांनी सुध्दा एक मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याच्यावर सुध्दा योग्य ती कारवाई करावी.

मर्लिन डिसा :-

महापौर मॅडम कॉंग्रेच्युलेशन तुम्हा दोघांना सगळ्या अधिकाऱ्यांना धन्यवाद. आमचे टर्म संपत आहे पण आम्ही तुमच्या बरोबर रोज करस्पॉडन्स करत राहू. लोकांच्या हितासाठी काम करत राहणार.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम मनोज दुबेजीने जो विषय मांडलेला आहे.

गिता जैन :-

इनके लिए भी एक थँकलेस जॉब है, वह दो जन है आप और हम यहाँ जो बैठे है लोकप्रतिनिधी और दुसरा है पत्रकार बंधु पत्रकारगण और लोकप्रतिनिधी यह दोना जब भी काम करते है इनके लिए थँकलेस जॉब है| उनको कोई सराया नही जाता है हम आपस या फिर दुसरो के अभिनंदन यहाँ पे दे रहे है| कभी सोचीए हमें अभिनंदन कहाँ से मिलता है हम जब काम करके जाते है लोग सहारा लेते है लेकिन यह बात भी हकीकत है, जब लोकप्रतिनिधी एक दुसरे से हट जाता है आखो से ओझल हो जाते है तो कोई लोकप्रतिनिधी गायब हो जाते है उसके पहले कोई ना कोई दुसरी जगह ले लेता है उसपे में खाली इतना कहूँगा नादान से हमेशा दोस्ती रखीए क्योंकी जब मुश्कील वक्त होता है तो समजदार किनारा कर लेता है| साथ छोड देता है इतनाही कहूँगा और तहे दिल से फिर से आयुक्त महोदय जी आपका भी धन्यवाद और महापौर मॅडम इन्होंने ऐसे भाई की तरह मुझे रखा उनका भी तहे दिल से धन्यवाद| हम अपने बारे में अभिनंदन या जादा क्या कहते है खुशल बात नही करेंगे और इसके पिछे जो यंत्रणा थी जो हमेशा रहती है वो हे अधिकारी वर्ग जिस तरीके से फर्स्ट टर्म था नगरसेवको का फर्स्ट टर्म था, उपमहापौर का आयुक्त महोदयजी आपसे लेके आपके सहयोगी से लेके और सचिव महोदय आपसे जो भी है ऐ ग्रेड हो, बी ग्रेड हो, सी क्लास हो सभी को इस टेबल से इस सभागृह से में उनका तहे दिल से धन्यवाद देना चाहूँगा की उन्होंने हमेशा काम करने के लिए हमेशा मुझे मदत की चाहे किसी भी प्रकार का हो और आप सभी सदस्यों को आनेवाले समय के लिए यहाँ पे जो बैठे है एक विराम देने जा रहा हूँ एक शायरी दे के ङि के. सर हम सभी के लिए वह लागु होती है यहाँ पे जो भी बैठे है उनके लिए “मुसाफीर हो तुम भी मुसाफीर हो हम भी, किसी मोड पर फिर मुलाकात होगी यह यकीन है मुझे” धन्यवाद.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आज 26 ऑगस्ट ह्या सत्रातील शेवटची महासभा सकाळीच आज स्थायी समितीच्या बैठकीला पण गेलो होतो आणि त्याचबरोबर सलग आपल्याकडे तहकुब महासभ आणि विशेष महासभा असे आयोजन केलं होतं आता सर्व सन्मा. नेते, मा. आमदार मॅडम, सर्व नगरसेवक यांनी आपआपल्या भावना इथे प्रकट केल्या चांगला सल्ला ही दिला काही शिकवण ही मिळाली आणि विशेषत: प्रशासन आणि महापौर सर्वांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. रोज भांडण करणारे पण एकमेकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात हे ऐकून मला हे खुप छान वाटते आणि जुबेर भाई म्हणाले हे आमचं मतभेद आहेत मनभेद नाहीत आणि इथुन बाहेर गेलो की इतपर्यंत आम्ही एकच असतो. अतिशय चांगली गोष्ट आहे. सर्वप्रथम मी आपले महापौर मॅडमचे मनापासून अभिनंदन करतो आभारही व्यक्त करतो. गेले अडीच वर्षापैकी जवळ पास मला दिढ वर्ष झाले ह्या ठिकाणी येऊन आयुक्त म्हणून काम करतो. कोविडमध्ये बरेच चांगले वाईट सगळे अनुभव आले सव्रप्रथम मी थोडक्यात सांगतो टेंभा हॉस्पीटल मी रात्री अडची तीन वाजता उभा होतो तिथुन मी महापौर मॅडमला फोन केला की महिला महापौर आहेत इतक्या रात्री कळवावे की नाही कळवावे परंतु त्या वेळेस पुरुष आहे महिला आहे, वरिष्ट, कनिष्ठ कुठलाही मतभेद नव्हता फक्त जीव वाचवणे एवढेच एक उद्दिष्ठ ठेऊन ऑक्सीजनची कमतरता ह्या दोन तीन तासात ऑक्सीजन संपेल 100-200 जिवितांना हानी होईल त्यावेळी महापौर मॅडमने आदेश दिले की काही करा आयुक्त आपले लोक वाचले पाहिजेत. अडीच वाजता आम्ही टेंभा हॉस्पीटल समोर आहे टँक मधला ऑक्सीजन संपत आला आहे. तेव्हा पण ग्रीन कोरीडोअर करुन तडोजा वरुन ऑक्सीजनचे टँकर आणले होते. निम्मा एक टँकर होता निम्मा ऑक्सीजन आपला आणि निम्मा वसई विरार महापालिकेचा होता. दोन दिवस बातमी झाली की मिरा भाईंदरच्या आयुक्तांनी टँकर पळवला वगैरे परंतु लोकांचा जीव वाचविण्यासाठी दुसरा कुठला पर्याय नव्हता. मिनटा मिनिटाला महापौर मॅडम यांच्या संपर्कात होतो त्याचबरोबर सन्मा. आमदार गिता जैन मॅडम देखील संपर्कात होत्या. 40-50 पेशंट आहेत अर्धा तासात ऑक्सीजन संपेल म्हणाले की खाजगी हॉस्पीटलची सगळी लोक हसमुख भाई आणि गिता जैन मॅडमच्या दारात जाऊन

रात्री 3 वाजता बसायचे. थोड्या वेळात ऑक्सीजन संपत आहे. ती पण पहाट आणि रात्र ह्या शहरातली मी पाहिली आहे. तर त्या काळात आपल्या सर्व सन्मा. नगरसेवक सगळेच पदाधिकारी यांनी जीवाचे रान करुन खुप मेहनत घेतलेली आहे. प्रशासनाबरोबर इतकच किंबहुना आमचे पेक्षाही जास्त फिल्डमध्ये जाऊन काम केलेले आहे आणि तुम्हाला साथ द्यायचे देखील आमचे प्रशासनाने नक्कीच तेवढे कार्य केलेले आहे. मॅडम बरोबर बऱ्याचदा वॉक विथ कमिशनर मी फिरलेलो आहे. त्यांच्या प्रभागात वेगवेगळ्या अडचणी होत्या त्या देखील मी पाहिलेल्या आहेत. बी.एस.यु.पी. बुध्दविहार ह्या मॅडमचे तसे दोन प्रोजेक्ट होते मा. महापौर मॅडमने बी.एस.यू.पी ला जरा स्ट्राँग पाठपुरावा केला नसता तर ते अद्यापपर्यंत बी.एस.यू.पी. अशीच राहिली असती असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. त्यांचा एक स्ट्राँग पाठपुरावा होता त्यामुळे ते काम करण्याला पर्याय नव्हता आणि किंबहुना तिथे असणारे नागरीक त्यांचे जे हालअपेष्टा होत होत्या म्हणूनच मॅडमने त्यात खुप पाठपुरावा केला होता. त्यामुळे बी.एस.यु.पी. चे काम असेल आता रमाबाई आंबेडकरांचे कमानीचे काम असेल त्या प्रभागातली वेगवेगळी विकासाची काम असतील. इव्हन रोज सी.एस.आर. मधून आपण अदाणीच्या माध्यमातून त्यांच्या वॉर्डात गार्डन डेव्हलप देखील करत आहोत. ते काम देखील असे उल्लेखनीय काम मा. महापौर मॅडमच्या सोबत केली. अडीच पैकी जवळपास पाऊणे दोन वर्ष आपण ऑनलाईन महासभा केल्या. बऱ्याच जणांनी आपले तेव्हा ऑनलाईन प्रश्न मांडले परंतु शहरातील प्रश्न सोडविण्यासाठी सर्व सन्मा. सदस्यांनी जोर लावला. जुबेरभाई सारखे यांनी थोडा जास्त लावला. पण लावला. ते देखील मी पाहिले आहे आणि वॉक विथ कमिशनरनंतर जेवढी शहरात आपले प्रकल्प आहेत ते विरोधी पक्षनेता, गटनेता, महापौर, उपमहापौर यांच्या समवेत शहरातल्या विकासाची वाटचाल कशी होती हे देखील आपण शहरभर फिरुन पाहिले. महापौर मॅडमने अतिशय बॅलन्स राखून महासभेबरोबर प्रशासन आणि लोकप्रतिनिधी त्यांच्या सोबतचे सन्मा. सर्व नगरसेवक यांच्या मधला दुवा अतिशय चांगल्याप्रकारे हाताळला. वरिष्ठ लेव्हलवरुन होणारी अडचण आणि प्रशासना समोरचा स्पेस यातील देखील चांगला मार्ग काढण्यासाठी आम्हाला खूप मोलाचे सहकार्य केलं त्याचबरोबर आणखीन एक महापौर मॅडमचे स्वत: ते शिक्षक असल्यामुळे शिक्षण प्रती त्यांची खास ओढ होती. त्यांच्या प्रयत्नातून आपण ह्या वर्षी इयत्ता 9 वी चा वर्ग सुरु केला. सेमी इंग्लीश केली आणि जाता जाता गेल्या आठवड्यात देखील आपले पदाधिकारी आणि महापौर मॅडम दिल्लीत शैक्षणिक दर्जा काय आहे दिल्लीचा शैक्षणिक पॅअर्न काय आहे हे पाहण्यासाठी गेल्या होत्या. कालावधी संपला असेल तरी सुध्दा आम्ही पुढच्या आठवड्यात पानपट्टे साहेब जे अतिरिक्त आयुक्त शिक्षण विभागाशी एक आम्ही सहभाग ठेवणार आहोत. ज्याच्यामुळे शिक्षण दिल्लीत कसे चालते आणि मिरा भाईंदरला त्याचा काय फायदा होईल या अनुषंगाने देखील करणार आहोत. शिक्षणाबाबत त्यांची विशेष आस्था दिसून आली. त्याचबरोबर घोडबंदरचा किल्ला असेल, चिमाजी अप्पाचा किल्ला असेल याचबरोबर वेगवेगळे प्रकल्प असतील सगळ्या ठिकाणी त्यांनी स्वत: स्थळ पाहणी वेळोवेळी आमच्याबरोबर केली. तेही विशेष नमुद करण्यासारखे आहे. एकंदरीत काय तर प्रशासनाबरोबर अतिशय बॅलेंस साधून मन मोकळे पणाने सगळ्यांना सांभाळून घेऊन अतिशय चांगले सहकार्य केले त्याबद्दल मी मनापासून सन्मा. महापौर मॅडमचे धन्यवाद देतो. आभारव्यक्त करतो त्यानंतर आजचे आपल्या शहराचे सन्मा. आमदार गिता जैन मॅडम जिथे शासन दरबारी काही अडकले कारण मागे उल्लेख केला सन्मा. सदसयंनी की ह्यापूर्वी राज्यात महाविकास आघाडी सरकार होती आणि इथे भाजपचे स्थानिक संस्था होती. तर दोन्ही बाजू बऱ्याचदा तफावत व्हायची. निधी असेल काम असेल तर ज्या ज्या वेळी मंत्रालयात अडचण असायची त्या त्या वेळी तिथले स्थानिक आमदार म्हणून आम्ही नेहमीच गिता जैनची मदत घेतलेली आहे आणि किंबहूना पुढेही घेत राहू. जोपर्यंत विधान सभेचा कालावधी आहे तोपर्यंत त्यांना निश्चित ती मदत करावी लागेल. त्यांनी वेळोवेळी आम्हाला ह्यासाठी मदत केलेली आहे. निधी असेल मंत्रालयातील काम असेल विशेषत: सुर्या धरणाचे आता जे आपल्याला पाणीच्या अनुषंगाने दिल्ली सरकारने मान्यता

देखील दिलेली आहे. आज उदया नोटिफिकेशन निघेल त्यासाठी सुध्दा सन्मा. आमदार जैन मॅडम सिवरेजसाठी आपण त्यावेळेला २८९ कोटीचे प्रस्ताव दिला होता. हे दोन्ही प्रस्ताव मंजूर होण्यासाठी आपल्याला मोलाची मदत झाली. अर्थात इथे सभागृहात सदस्य आहेत त्याचे आपल्याला नगरसेवक म्हणून शिवाय येथील आमदार म्हणून खूप आपल्याला मदत झाली म्हणून त्या कामी त्यांची शेवटची महासभा म्हणून इथले स्थानिक नगरसेवक स्थानिक नगरसेविका म्हणून मनापासून मी आभार व्यक्त करतो आणि सन्मा. आमदार म्हणून पूढे असे सहकार्य राहील अशी अपेक्षा व्यक्त करतो. त्यानंतर ज्याच्या नावात हास्य आहे असे हासमूख ते खरोखरच मी त्यांना नेहमी म्हणतो तुम्ही प्रशासक जास्त वाटता आणि राजकारणी कमी वाटतो ते पहिल्याच टर्मला विक्रमभाऊनी सांगितले की ते पहिल्यादांच नगरसेवक झाली आणि उपमहापौर झाले तर त्याच्यात प्रशासकपणा जास्त आहे आणि राजकारणी पणा कमी आहे प्रशासकीय पेच होईल तेव्हा आम्ही ब-याच वेळा दळवी साहेबांबरोबर हसमूख भाईना पकडायचो कारण तिथे धृवकिशोर साहेबांचे ओपिनियन होते कारण बाजू प्रशासनाची होती त्यामूळे आम्ही हसमूख ह्यांना पकडायचो ब-याच वेळी उपमहापौर साहेबांचा वेळोवेळी आम्हाला नेहमी उपयोग झालेला आहे. प्रशासनाला कोरोनाच्या काळात देखील असेल ज्यावेळी पक्षात सारे मतभेद असेल, बॅलेन्सिग करायचे असेल तेव्हा त्यांनी प्रशासनाला नेहमी सहकार्य केले म्हणून त्याचे देखील मी मनापासून आभार व्यकत् करतो. आपले सभागृहनेते दळवी साहेब आपण बेस्ट कॉर्डिनेटर म्हणून आम्हाला नेहमी सहकार्य केले. जुबेरभाई जेव्हा असे सांगायला झाले तर सत्ताधारी आणि प्रशासनाला पेच सोडवण्यासाठी आपण दळवी साहेबआंची नेहमीच मदत घेतलेली आहे आण जेव्हा रस्सीखेच होत होती तानातानी होती तेव्हा नक्कीख् त्श्संपी अतिशय बॅलेन्सिग घेतला ज्यामूळे प्रशासन आणि राज्यकर्त्यात कठोर रूलिंग दिली नाही हे ही त्यात अधोरेखीत केलेले पाहिजे म्हणून दळवी साहेबांनी देखील आपल्याला त्यांच्या टाईममध्ये खूपखूप मदत केली दोन्ही सत्ताधारी पक्ष असतील विरोधी पक्ष असेल आणि प्रशासन असेल सगळयांचा मधला अतिशय चांगला मार्ग साधून प्रमूख दूवा म्हणून काम केल ज्यामूळे प्रशासनाचा आणि राज्यकर्त्याचा प्रत्येकांचा सन्मान देखील राहिल आणि काम देखील झाले म्हणून त्यांचे पण मनापासून आभार व्यक्त करतो. तसेच स्टॅन्डीग सभापती राकेश शहा, दिनेश जैन, अशोक तिवारी ह्या सर्वानी प्रशासनाला चांग्रले सहकार्य केले वेळोवेळी मदत केली आणि अतिशय हसत खेळत कोरोनाचा खराब कालावधी असताना वाईट कालावधी असताना देखील व्यवस्थित मार्गक्रमण केले त्यामूळे मी सर्व स्थायी सभपतीचे आभार मानतो. तसेच वेगवेगळया पक्षातले गटनेते माझ्या कालावधीत दोन वेगळे पक्षनेत होऊन गेले प्रविण पाटील साहेब आणि धनेश पाटील परंतू निलम ढवण मॅडमनी विरोधी पक्षनेत्याची प्रमूख भूमिका केली प्रशासनाबरोबर त्यांनी त्यांचे व्यवस्थित वर्तन ठेवले सत्ताधारी आणि विरोधी पक्ष ह्यांचा नेहमी ताळमेळे घालण्यात ते नेहमीच सहकार्य केल. त्यामूळे मी विरोधी पक्षाचे देखील मनापासून आभार व्यक्त करतो जुबेरभाई आपण नेहमीचे कॉग्रेसचे गटनेते आहात खरतर इथले सगळयांचे तुम्ही गटनेते आहात आणि आपले म्हणणे प्रभावीपणे मांडतो सोबत अनिल सावंत साहेबांची मदत घेवून जोरदार न्याय मांडून त्यांनी प्रमूख काम केले त्याबद्दल देखील आपल मनापासून आभार व्यक्त करतो. परंतू हे करत असताना कधीही प्रशासनाची कटूता नाही आपण केबीनमध्ये भेटलो तर अतिशय हसत खेळत जेवढे पण आपण निर्णय घेतले ते अतिशय चांगले धेतले जातांना कसलीच कूठलीच कटूता राहणार नाही याची दखल आपण आपल्या स्तरावर जरूर घेतली त्याबद्दल मी आपले आपल्या पक्षाचे सर्व सदसयांचे देखील मनापासून आभार व्यक्त करतो खरतर आपल्याकडे काही सन्मा. सदस्य खूप हूशार आहेत एखदे काम करायचे असेल तर त्यांच्याकडे फाईल आहे त्या अधिका-याला आयुक्त केबीनच्या बाहेर आणून उभा करायचे जस मी खांबित साहेबांच्याकडे काम आहे तर खांबितला आणि राज नाही तर महेश भोसलेच्या केबीनच्या इथे उभे करायचो किंवा बाहेर ठेवायचे साहेब ते काम आहे मी बघतो म्हणाली के ते एक मिनिटात तिथे फाइालसह प्रकट होणार ते मी तूमच्यापन शिकतो. आयुक्त पण

हया मंडप चांगले शिक्षण मिळाले आणि अर्थात ते नक्कीच माझे पण काम करण्यासाठी कार्यशैलीसाठी नक्कीच चांगले आहे एखादे काम करून घेण्यासाठी फाईल तयार करणे त्या अधिकारी कर्मचा-यांना गाठणे त्यांना सेटींग करून तिथपर्यंत घेवून येणे. समोरच आयुक्तांना बोलतांना फाईल तिथे देणे त्याच्यावर सकारात्मक निर्णय होईल याची दक्षता घेणे हा सुध्दा चतूरार्दचा किंवा काम करण्याचा मॅच्यूरिटीचा एक भाग आहे त्यामूळे असे पण सर्व नगरसेवकांचे मी मनापासून धन्यवाद मानीन की त्यांनी आपले कामही करून घेतले आमचे अधिकारी कर्मचा-यासोबत घेवून म्हणजे असे सांगण्यासारखे खूप आहेत आपल्याकडच्या काही महिला नगरसेविका आहेत अतिशय महिला असून सुध्दा कर्तव्यदक्षपणे काम केले आहे. जसे उत्तनचे आपल्या नगरसेवकि आहेत शर्मिला मॅडम म्हणाल्या की कायम कचरा निवडणे खड्डे येणारी वाहन संघर्ष पेटता ठेवला पण कचरा प्रश्न चांगला सोडवला इव्हन उत्तम निसर्ग संपन्न असलेली ठिकाण आहेत त्याठिकाणी देखील निसर्गाचे नैसर्गिक सौदर्य अस्तित्वात राहावे म्हणून त्यांनी कसोशिने प्रयत्न करतांना मनपाच्या अधिकारी कर्मचा-याच्या पाठीमागे लागून जास्तीत जास्त काम करणा-यासाठी सर्वच महिला नगरसेवकांनी देखील आपआपल्या परीने प्रयत्न केले तशा सर्व महिला नगरसेकांचे देखील मनापासून धन्यवाद व्यक्त करतो. त्यांना देखील आता एन यू एन एम साठी सर्वाच्या बरोबर मलाही धन्यवाद दिला त्याबद्दल मी आभार व्यक्त करतो त्याचाही परिचय खरतर मी इथे येण्याच्या अगोदर पासून होता. आताचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब पूर्वी नगर विकास मंत्री फार पूर्वीपासून ती त्यांच्याकडे असताना माझा परिचय होता त्यामुळे एकंदरीत काम करण्याची पध्दत त्यांना कदाचित माझ्या अगोदर पासून माहित होती. आपल्याला स्विकृत नगरसेवक म्हणून येणारे पाच नगरसेवक त्यांनीही आपल्याला वेळोवेळी सहकार्य केलेले आहे त्या बद्दल त्यांच्यासह सर्व नगरसेवक व विरोधी पक्षातील असणारे सर्व नगरसेवक तसेच गटनत्यांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो. आपली उदया मुदत संपत आहे. अजून महत्वाचे राहिले रोहिदास काका मला म्हणाले माझे दोन मिनिटाचे काम आहे परंतू येताना सोबत ७-८ माणसे घेवून येणार प्रत्येक पत्रावर पाच मिनिटे बोलणार तर एक शिकण्यासारखे आहे अधिका-यांना पण शिकण्यासारखे आहे की दोन मिनिटे बोलणार असे सांगून २० मिनिटे कशी घ्यायची आणि काम करून घ्यायचे हे जेष्ठ नागरिक असून सुध्दा आपण त्यातून शिकण्याची गोष्ट आहे २-४ मिनिटे बोलून जरी घेतले तर त्यांनी खूप वेळ आपल्या कामासाठी ते आग्रही राहीले त्यामुळे अशा काही जेष्ठ नागरी सुविधा आहेत त्यांच्याकडून सूध्दा अधिका-यांना शिकायला मिळते तर त्याचही मी मनापासून आभार व्यक्त करतो. आपले माझा उल्लेख चतूराईने करणारे धृवकिशोर पाटील साहेब तुम्हालाही मनापासून धन्यवाद देतो त्यांनी कुस्तीच्या आखाडयाला देखील उल्लेख केला तर कुस्तीचा आखाडा हा प्रत्येक डावासाठी प्रसिध्द आहे. आणि तुम्ही तिथले सन्मा. सदस्य आहेत आणि त्या कुस्तीच्या आखाडयाशी आपला अतिशय जवळचा संबध आहे. म्हणून डाव प्रतिडाव खेळण्यासाठी आखाडा लागतो म्हणून तुम्ही तिथे जाता मी पण तिथे येत असतो योगायोगाचा भाग आहे आणि अजून एक उल्लेख केला साहेब तुम्ही स्पिडी आहेत तसे तुमचे अधिकारी पाहिजेत स्पिडमध्ये थोडा फरक असेल कोणाला इंजिन तर कोणाला डबा वहावे लागते सर्वच इंजिन झाले तर डबे कोण ओढणार पण काही डबे काही इंजिन असा तो संगम असतो. तरी पण आपण वेळोवेळी सांगत असतो सुचना करत असतो. हयाच बरोबर नेहमीच शाब्दिक चकमक असेल मतभेद असेल परंतू ते अर्थात हया शहराच्या हितासाठी वैयक्तिक कुठली असान धरता तुम्ही वेळोवेळी सहकार्य केले आपले मुद्दे गळी उतरवले. ब-याच गोष्टी आम्हाला शिकायला मिळाल्या त्याबद्दल मी तुमचेही मनापासून आभार व्यक्त करतो आम्हाला अजून एक शिकायला भेटले की काम होत नसेल तर मांडी घालून उपोषनाला बसतात त्याला नियम नाही नोटीस नाही जसे की आपल्या रिटा शहा मॅडम ते काय अगोदर सुचना देणार नाहीत उपोषणला बसतात तुमच्या बाजूला राजीव साहेब असतील जोपर्यंत काम होत नाही तोपर्यंत उपोषण हा एक हया शहरात आल्यानंतर आयुक्त म्हणून मला शिकायला मिळालेले आहे. तर चांगली गोष्ट आहे आमच्या वाकोडे साहेबाकडचे विषय आहेत ते

सुटत नाही म्हटले की रिटा शहा मॅडम तिथेच उपाषणाला सूरू आयुक्त दालनासमोर ठिक आहे पण तरी सुध्दा आपण जेष्ठ नागरीक आहात शहराच्या विकासासाठी तेही कधी कधी गरजेचे असते त्याबद्दल तुमचेही मनापासून अभिनंदन व्यक्त करतो आभार व्यक्त करतो ह्या एक वर्षाच्या काळात बरेच विकासाची कामे करताना पंधरावी मुर्धा क्रिडा संकूल नयना म्हात्रे मॅडम, जयेश भोईर आणि त्यांचे सगळे सहकारी त्यांच्या प्रयत्नातून तेही एक अतिशय चांगले काम झाले. ६० फुटी रोडचे क्रिउा संकूल तयार होत आहे. फेरीवाल्यांचा प्रश्न आहे आता जे अनेक सदस्यांनी आपल्या भाषणात प्रशासकीय काळात देखील हे काम करायचे आहे किंवा करणे कसे आवश्यक आहे गॅरेज असेल, फेरीवाला असेल, अतिक्रमण असेल त्यांच्यासाठी प्रशासन कटीबध्द आहे. आणि ते नक्कीच आम्ही सर्वजण मिळून करु अशी मी तुम्हाला खात्री देतो. काही काही गोष्टी अशा असतात की, त्यातील 10 पैकी 5 नगरसेवक सांगतात ते करायचे नाही आणि दुसराच गट येऊन सांगतो त्यावेळी प्रशासनाची तारेवरची कसरत असते. काही जणांचे मत राहते की आपल्या शहरात कुत्र्यांचा फार त्रास होतो निर्बीजीकरण असेल किंवा कुत्र्याचे भुंकणे असेच चावणे असेल. त्याचा बंदोबस्त लगेच झाला पाहिजे दुसरा एक प्राणीप्रिय गट एन.जी.ओ. येतात. त्याच्यावर भुद द्या दाखवा जीव द्या दाखवा तसेच फेरीवाल्याचे आहे. काही फेरिवाले कुठे जाणार साहेब ते जगणार कशावर ते गरीब जरी असले तरी इथले नागरिक आहेत. त्यांचा ऊर्दनिर्वाह साधन आहे त्यामुळे फेरिवाल्यांवर कारवाई करु नका असे सांगणारे काही सन्मा. सदस्य आपल्या पैकी आहेत. त्याचबरोबर फेरिवाल्यांचा बंदोबस्त झालाच पाहिजे. नाहीतर मी उपोषण करेल म्हणणारे दिनेश जैन देखील आपल्या बरोबरच आहेत. म्हणजे प्रशासनाला तारेवरची कसरत तारेवरची कसरत कशी करावी लागते त्याचा एक नमुना आहे. त्यामुळे ती कसरत करताना आम्ही पण तुमच्यामुळे बऱ्याच गोष्टी शिकत असतो. किंबहूना दिढ वर्षाचा काळात मी पण बरेच तुमच्या सोबत राहून परत शिक्षण घेतले आहे त्याच्याबद्दल मी तुमचे सगळ्यांचे त्याअर्थाने रुणी आहे. कोरोनाचा कालावधी असताना देखील ह्या शहरात आपण महत्वाच्या बाबी घ्या मी दोन मिनिटात सांगुन संपवतो. पिण्याचा पाण्याचा प्रश्न होता अंतिम टप्प्यात आलेला आहे. 2050 पर्यंत पिण्याचा पाण्याची कमतरता कायमची नष्ट होणार आहे. अलमोस्ट ऑल 70 टक्केहून जास्त काम प्रकल्पाचे झालेले आहे. अंतर्गत पाईप लाईनसाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या मदतीने आपल्याला निवडणुकीचा काळापर्यंत पुढच्या निम्मे काम होईल आणि किंबहूना येत्या सप्टेंबर 2023 पर्यंत ह्या शहरात 2050 पर्यंत 24 तास पुरेल इतक पाणी मिळेल आणि कायमचेच ह्या शहराची समस्या मिळून जाईल. त्यामुळे तेही चांगले आहे. त्याचबरोबर ह्या दिढ वर्षाचा कोरोनाच्या काळात मा. महापौर महोदया तसेच आपले सोबत सगळ्यांच्या बरोबर काम करता ना ह्या शहराचे फलक लक्षात घेण्यासारखे विषय म्हणजे स्वच्छ भारत अभियान मला खात्री आहे. ह्या वर्षी देश पातळीवर राज्य पातळीवर आपण येऊन परंतु देश पातळीवर ज्या राज्यातल्या टॉपच्या महापालिका आहेत. जस नवि मुंबई महानगरपालिका असेल, ठाणे महानगरपालिका असेल, पुणे आहे पिंपरी चिंचवड असेल औरंगाबाद नागपुर आहे अशा मोठ्या महानगरपालिकेच्या बरोबरीचे स्थान ह्या महानगरपालिका मिळून पहिल्या 5-7 मध्येच देश पातळीवर आपण तुमच्या सगळ्यांचा मार्गदर्शनामुळे मा. महापौर मॅडमच्या नियोजनासमोर उपमहापौर महोदयांच्या गाईडन्समुळे असेल आणि आपले सर्वाच्याच त्याही ठिकाणी आपण देश पातळीवर नक्कीच बाजी मारु माझी वसुंधराच्या बाबतीत मध्यंतरी आपला नंबर आला होता. मा. महापौर मॅडमने तत्कालीन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते पुरस्कार देखील प्रदान करण्यात आला होता. राजीव गांधी प्रशासकीय गतीमान पुरस्कार देखील आपल्या महापालिकेला गेल्याच वर्षी मिळालेला आहे. त्यामुळे अशा अनेक पुरस्काराचे मानकरी होण्याचा देखील कोरोनाचा काळ असुन सुध्दा महापालिकेला बहुमान मिळालेला आहे. ते केवळ आपल्या सोबत असणारे सर्व नगरसेवक सर्व प्रशासन, महापौर, उपमहापौर यांच्यामुळे शक्य झालेले आहे. त्यानंतर स्वच्छ सर्व्हेक्षणमध्ये पण आपण देश पातळीवर राज्य पातळीवर चांगल्या ठिकाणी कॉम्पीटीशन करतोय.

सफाई मित्र सुरक्षा चॅलेंजेस आपण राज्यात दुसरा आणि देश पातळीवर आठवा आलेलो आहोत. त्यासाठी सुध्दा आपले सर्वांचे भरीव मार्गदर्शन सहकार्य लाभले. ते देखील मी अधोरेखित करतो. कोविडमध्ये माझ्या अगोदर बऱ्याच सन्मा. सदस्यांनी उल्लेख केला कोविडच्या कामाची दखल घेऊन मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, केंद्रीयमंत्री गडकरी साहेब वेगवेगळे लोकप्रतिनिधी असतील यांनी देखील मिरा भाईंदरच्या ह्या कामाची दखल घेऊन अतिशय चांगल्या पध्दतीने कौतुक केलं. आपल्या सर्वांचा ह्यात महत्वाचा वाटा आहे आणि आपल्या सगळ्यांच्यामुळेच हे शक्य झाले. त्याचबरोबर ह्या शहरात आपण आझादी का अमृत महोत्सव हे देखील चांगले राबविले आहे. त्यानंतर हे काम करत असताना जाता जाता मला सन्मा. सदस्यांनी सुचना देखील दिली त्यात प्रामुख्याने गणपती पूर्व आपले खड्डे मुक्त मिरा भाईंदर असले पाहिजे. तेही काम आपण हाती घेत आहोत. त्याचबरोबर फेरिवाले, गॅरेजेस, शहराचे सौंदर्यीकरण हे देखील करुया. मधल्या काळात जरी आपण प्रशासक म्हणून कामकाज करणार असेल तरी जे आपले विद्यमान सदस्य आहेत त्यांनी वेळोवेळी ज्या सुचना करतील त्या पुढेही त्यांच्यानुसार कामकाज चालू राहील. आपल्यातल्या प्रभागातील जे जे प्रश्न येतील जे नियमात बसणारे आहेत प्रशासक जरी असला तरी शेवटी जनतेसाठी आणि तुमच्या सगळ्यांसाठी आहे. त्यामुळे नियमात बसणारी सर्व कामे आपल्या ज्या ज्या प्रभागातील जे आपले सन्मा. सदस्य सांगतील ते काम वेळेत आणि पूर्ण होतील. याची मी तुम्हाला खात्री देतो. सर्वांत महत्वाचे म्हणजे आपण नेहमी आमच्या जुबेर भाईंचा उल्लेख असतो की आपण सर्वजण ह्या महापालिकेत ट्रस्टी आहोत. मला वाटते दोन दिवसानंतर ट्रस्टीचा रोल देखील आयुक्तांना करायचा आहे. त्यामुळे आयुक्त अधीक प्रशासन म्हणून ट्रस्टी अधिक आयुक्तांचा रोल करायचा असल्यावर शहरात येणाऱ्या समस्या असतील कचऱ्यापासून, खड्डयांपर्यंत, अतिक्रमणपर्यंत ह्या सगळ्या कामासाठी इथुन पुढे तुमची मदत राहील. अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. दरम्यानच्या काळात ह्या ठिकाणी प्रशासक जरी असला तरीही हे श्रेय अतिशय व्यवस्थितपणे मधल्या काळात संभाव्य राहील जेव्हा पुन्हा निवडणुक होईल निवडून तुम्ही याल तोपर्यंत ते सुरक्षितपणे आपल्या हाती स्वाधीन करण्यात येईल. एवढी तुम्हाला मी ह्या ठिकाणी खात्री देतो. आणि वेळोवेळी आपण सर्वच कामात प्रशसनाला सांभाळून घेतले मदत केली कोविड सारख्या वाईट काळ देखील आपण सोबत सगळ्यांनी पाहिला. ह्या कालावधीत आपल्याला काय दिलं कोविड सारख्या एक महाभयंकर रोग आहे त्याने काय शिकवले स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव देखील आपल्या सगळ्यांच्या उपस्थितीत झाला आहे. ह्याचवेळी सुर्दैवाने मी आयुक्त असण्यासाठी मी महापौर, उपमहापौर किंवा आपले सर्व सदस्य असण्याचा एक सौभाग्य लाभले हे मिरा भाईंदरमध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सादर करताना नगरसेवक होते. हे महापौर होते किंवा हे आयुक्त होते. हे देखील आपण अतिशय सगळ्यांनी अनुभवलेले आहे, पाहिलेले आहे. पुढे आपले असेच सहकार्य राहू द्या. वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल मी मनापासून आपले आभार व्यक्त करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

मा. उपमहापौर :-

आयुक्त महोदय, प्रशासकीय आणि शासकीय म्हणजे इनडायरेक्टली आता सोमवारपासून आपण आई आणि वडील ह्या दोन्ही भुमिका आपण निभावणार आहोत. आणि सर्व सदस्यांची मनापासून इच्छा पण आहे आणि मनापासून हे पण खर आहे की ती भुमिका तुम्ही पूर्णपणे पाडणार आहात.

मा. महापौर :-

प्रत्येक महासभेमध्ये आपण सर्वजण महापौरांच्या परवानगीने बोलतो असे म्हणून भाषणास किंवा संभाषणास सुरुवात करायची आहे. आज मी तुम्हास सर्व सभागृहाची परवानगी घेऊन बोलते.

मा. आयुक्त :-

एक सर्वात महत्वाचे राहिले आहे महापौर मॅडमच्या परवानगीने परत बोलतो, सगळ्या त्या दिढ दोन वर्षाच्या कालावधीत सर्व पत्रकार सर्व सोशियल मिडियाचे चॅनलचे प्रतिनिधी यांनी वेळोवेळी

अतिशय महत्वाचे सहकार्य केलेले आहे. कोविडच्या काळात अतिशय म्हणजे अप्रतिम कामगिरी केली आमच्यातील जसे काही अधिकारी / कर्मचारी आपल्याला सोडून गेले तसे आपले काही पत्रकार बंधु देखील ह्या लोकांच्या फिल्डवर असताना मी पाहिले आहेत. पत्रकारांना देखील सुट्टी नव्हती. जशी अधिकारी / कर्मचाऱ्यांना नव्हती तशी, प्रत्येकाला आपली बातमी देणे जनतेपर्यंत पोहोचणे तर आमच्या बरोबर कोविडच्या काळात आम्ही नेहमी सुध्दा सहकार्य करणारे सर्व वेगवेगळ्या चॅनलचे प्रतिनिधी असतील, प्रिंट मिडीया असेल सर्व पत्रकार असतील त्यांचे देखील मी मनापासून धन्यवाद व्यक्त करतो. आपण रोज उद्‌यापासून भेटणारच आहोत परंतु ह्या मधल्या काळात अतिशय महापौर मॅडम, उपमहापौर आणि आपल्या सगळ्या बॉडीचे बरोबर काम करताना तुमचे देखील तितकेच महत्वाचे सहकार्य आहे. त्यामुळे मी तुम्हाला देखील मनापासून धन्यवाद देतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

मा. महापौर :-

सभागृहाच्या परवानगीने बोलते, महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा. महामानव भारतरत्न परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांना कोटीकोटी अभिवादन. भारत देशाचे आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या आर्शिवादाने तसेच आदरणीय मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदेजी, महाराष्ट्राचे आदरणीय लाडके उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीसजी यांच्या मार्गदर्शनाने आदरणीय आमदार श्री. रविंद्र चव्हाणजी यांच्या छत्रछायेत तसेच मिरा भाईंदर शहराचे सनमा. माजी आमदार श्री. नरेंद्र मेहताजी यांच्या नेतृत्वात सन्मा. मिरा भाईंदर शहराचे आमदार श्री. प्रताप सरनाईकजी सन्मा. आमदार श्रीम. गिता जैनजी यांच्या सहकार्याने तसेच सन्मा. महापालिकेचे आयुक्त दिलीप ढोलेजी, सन्मा. उपमहापौर हसमुख गेहलोतजी, सन्मा. स्थायी समिती सभापती राकेश शहाजी, सन्मा. सभगृहनेते प्रशांत दळवीजी, सन्मा. विरोधी पक्षनेते धनेश पाटीलजी, सन्मा. गटनेते जुबेर इनामदारजी, सन्मा. गटनेत्या निलमताई ढवणजी, सन्मा. महिला बालकल्याण समितीच्या सभापती मिरादेवी यादवजी, उपसभापती विविता नाईकजी, अतिरिक्त् आयुक्त संभाजी पानपट्टेजी, सन्मा. अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकरजी, सन्मा. शहर अभियंता दिपक खांबितजी, सुरेश वाकोडेजी, सन्मा. उपायुक्त श्री. मारुती गायकवाडजी, सन्मा. उपायुक्त रवी पवारजी, उपायुक्त संजय शिंदेजी, कार्यकारी अभियंता नानेगावकरजी तसेच अग्निशमन अधिकारी बोराडेजी, विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग आणि ह्या सभागृहाच्या बाजुला असलेले माझे सर्व सन्मा. पत्रकार बंधु सर्व सन्मा. चॅनलचे प्रतिनिधी, मिरा भाईंदर शहरातील आदरणीय समस्त नागरिक बंधु भगिनी आणि मिरा भाईंदर शहरातील सर्व समस्त जनता सर्वांच्या आर्शिवादाने आज ह्या ठिकाणी मला महापौर पदाचा जो बहुमान मिळाला याकरिता मी सर्वांचे मनपूर्वक आभार व्यक्त करते. सन 1997 ला राजकीय प्रवास सुरु केला आणि आज ह्या ठिकाणी ह्या महापालिकेमध्ये विहित पद मी भुषवली आणि ही भुषवत असताना सभापती ते महापौर पदाची कारर्किद होती इतपर्यंत पोहोचण्याकरिता परमेश्वराने तसेच सर्व जनतेने सर्व सन्मा. नगरसेवकांनी मला आर्शिवाद दिला. या करिता मी सर्वांचे मनपूर्वक आभार व्यक्त करते. महापौर पद ज्या वेळेला मी घेतले आणि तेव्हा पुष्पगुच्छ स्विकारत असतानाच ह्या शहरामध्ये कोरोना हा संसर्गजन्य रोगाने पाऊल ठेवले आणि एक मोठे आव्हान माझ्या समोर उभे राहिले आणि त्यावेळेला मिरा भाईंदर शहरातील सर्व लोकप्रतिनिधी आणि सर्व प्रशासनाचे अधिकारी ह्या सर्वांच्या मदतीने हा कारोना कसा हाताळायचा ही माहिती कोणालाच नव्हती परंतु तरी सुध्दा प्रशासन लोकप्रतिनिधी आणि सर्व जनतेने एकत्रित येऊन ह्या ठिकाणी कोरोनाला नियंत्रण करण्यासाठी प्रयत्न केले. ह्या करिता तत्कालीन आयुक्त डांगेजी, विजय राठोडजी आणि वैद्‌यकिय विभागाचे सर्व अधिकारी यांनी सर्वांनी एकत्रित येऊन त्यावेळेला कोरोनाला नियंत्रण करण्यासाठी प्रयत्न सुरु केले. त्यासाठी कोविड सेंटर अलगीकरण केंद्र आय.सी.यू आणि व्हेंटीलेटर वॉर रुम ह्यासाठी प्रयत्न सुरु असतानाच आपले त्यावेळचे अतिरिक्त आयुक्त आणि आताचे आयुक्त श्री. दिलीप ढोलेजी यांना जेव्हा आयुक्त पद मिळाले त्याच्यानंतर प्रशासनाच्या कामकाजाला गती मिळाली

आणि कोरोना ह्या शहरातून नष्ट करण्यासाठी अतिशय जोमाने काम सुरु झालं आणि त्या परिस्थितीमध्ये लॉकडाऊनमध्ये नागरिक अधिकारी सुरक्षित रहावे म्हणून सर्व पोलिस कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी हे सर्व रस्त्यावर उतरले आणि लोकांचे जनजागृती केली. लोकांना घरामध्ये ठेवणे फार महत्वाचे होते त्यावेळेला कारण जर लोक रस्त्यावर उतरली असती तर एकमेकांच्या संपर्कात येऊन पुन्हा कोरोना वाढला असता. अशा वेळेला सर्व लोकप्रतिनिधी यांनी जिवाची पर्वा न करता अतिशय मेहनतीने लोकांमध्ये सुविधा पुरविण्याचे काम केलं मग त्या वेळेला त्यांनी स्वत:ची ही घेतली नसेल कितीतरी आपल्या नगरसेवकांना त्या वेळेला कोरोना झाला. किती तरी जण आपल्या घरच्या लोकांच्या याच्यामध्ये कोरोनाग्रस्त झाले आणि अशी परिस्थिती ह्या शहरामध्ये उद्भवली होती की जी भुतो न भविषयते प्रत्येकाला पुढे एक समस्या होती की याच्यातुन कसं बाहेर पडायचे. परंतु त्या वेळेला जस जस केंद्रशासनाचे आदेश आले राज्य शासनाचे आदेश आले आणि त्या निर्देशानुसार महापालिका प्रशासनाने पुढे पाऊल टाकले. त्यामध्ये लोकप्रतिनिधी सुध्दा आपल्या वॉर्डामध्ये लक्ष देऊन काम करत होते. त्यांचे मी धन्यवाद व्यक्त करते. तसेच हा कोरोना गेल्यानंतर पुन्हा ह्या शहरामध्ये जलद गतीने आपण कामकाजाला सुरुवात केली. त्यामध्ये आपले आयुक्त साहेबांनी आणि संपूर्ण प्रशासनाने बांधकामाची काम, विकासाची काम सुरु केली त्या वेळेला स्व. हिंदू हृद्‌यसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे कलादालनाचे भुमीपुजन व आपले स्व. प्रमोद महाजन कलादालनाचे भुमिपुजन सन्मा. आपले विरोधी पक्षनेता आदरणीय देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले याचा मला खरोखर मनापासून अभिमान आहे की ह्या दोन्ही थोरपुरुषांचे कलादालनाचे उद्‌घाटन माझ्या महापौर पदाच्या कारर्किदीमध्ये सुरु झाले. त्याचप्रमाणे शहरातील विविध शाळा उद्‌याने, मैदान, चौक, तरणतलाव, सी.सी. रस्ते, गटारे याचे उद्‌घाटन सुध्दा आपण आपआपल्या प्रभागामध्ये केले. ह्याच सभागृहामध्ये आपण 1 हजार कोटीच्या रस्त्याच्या कामांना मंजूरी दिली आणि येणाऱ्या भविष्यामध्ये आपल्या मिरा भाईंदर शहरामधील सर्व रस्ते सिमेंटचे होण्याकरिता ह्या करिता हा जो निधी आहे तो एम.एम.आर.डी. रोड आणि टी.डी.आर च्या स्वरुपात किंवा महापालिकेच्या निधीमधून आपण हे रस्ते करणार आहोत आणि मला असे वाटते प्रत्येक वेळेला ज्या ज्या वेळेला रस्त्यावरती खड्डे पडतात सणासुदीचे दिवस असतात, गणेशउत्सवाचे दिवस असतात. त्या वेळेला सर्वजण नगरसेवक सगळे नागरिक तक्रार करत असतात जर ह्या शहरामधील रस्ते सिमेंटचे झाले तेही समस्या आपली सुटू शकते. तर पुढे येणाऱ्या भविष्यामध्ये ह्या शहरातील सर्व रस्ते सिमेंटचे होणे फार अत्यंत गरजेचे आहे. त्याचप्रमाणे पाणी पुरवठा विभागामध्ये सुध्दा आपण सर्वांनीच सांगितले की सुर्या प्रकल्प योजना खरोखर येणाऱ्या भविष्यामध्ये ती जर पूर्ण झाली तर मिरा भाईंदर शहरातील पाण्याची समस्या सुटणार आहे. आपण गेल्या वेळेला चार दिवस पाईप लाईन तुटल्यामुळे पाणी ह्या शहरामध्ये येऊ शकले नाही. सर्वच पक्षांनी आंदोलन केली त्या वेळेला सर्वांची हीच अपेक्षा होती की पाणी व्यवस्थित आले पाहिजे. एम.आय.डी.सी च्या माध्यमातून स्टेमच्या माध्यमातून ह्या शहराला पाणी मिळाले पाहिजे आणि त्या वेळेला शहरामध्ये पाणी नाही म्हणून हाहाकार झाला होता त्या वेळेला रस्त्यावर उतरण्याखेरीज किंवा प्रशासनाच्या विरोधात बोलण्याखेरीज आमच्या हातात काही नव्हतं त्यावेळेला मी स्वत: महापौर असून सुध्दा मला आंदोलन करावे लागले. परंतु त्या आंदोलनाचा नंतर असा फरक झाला सर्व पक्षीय आंदोलन झाले. त्या आंदोलनाच्या फरक असा झाला की ह्या शहरामध्ये मे महिन्यात सुध्दा आपल्याला पाण्याची एवढी टंचाई भासली नाही आणि व्यवस्थित पाणी शहरामध्ये सुरळीतपणे सुरु झाले. त्यामुळे खरोखरच आज पुढे येणाऱ्या भविष्यामध्ये 125 एम.एल.डी. पाणी आपले एम.आय.डी.सी. कडे येणार आहे. ते पूर्णपणे मिळाले आणि सुर्या धरणाचे पाणी सुध्दा आपल्याला मिळालं तर ह्या मिरा भाईंदर शहराची पाण्याची समस्या ही सुटणार आहे. त्याचप्रमाणे आरोग्य विभागामध्ये सुध्दा अतिशय चांगल्या पध्दतीचे कामकाज आपण केलेलं पाहिलं स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर मला माहिती आहे की गटनेते आपले जुबेर इनामदारजी आणि निलमताई ढवणजी, अतिरिक्त

आयुक्त पानपट्टेजी आम्ही सर्वजण इंदौरच्या दौऱ्यावर गेलो होतो. इंदौर शहर पाहिजे आणि तिथुन आम्ही काही तरी शिकुन आलो. मिरा भाईंदर शहरासाठी स्वच्छ सुंदर कसं करता येईल. प्रशासनाच्या मदतीने सुध्दा ते कामकाज सुरु केलं त्याच वेळेला आयुक्त महोदयांनी सुध्दा अतिशय चांगल्या पध्दतीने आपले उपायुक्त रवी पवार आणि इतर सर्व स्वच्छतेचे अधिकारी यांच्या मदतीने शहरामध्ये धुमाकुळ घातला होता की स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर एक स्लोगन आपल्या शहरामध्ये सुरु होते आणि त्यावेळेला सर्व लोकप्रतिनिधी प्रभाग समितीचे सर्व सभापती सर्वांनी आपली रॅली काढली. शहरामध्ये आणि त्याचा परिणाम असा झाला की आपले मिरा भाईंदर शहर आजही आपण पाहतो की स्वच्छ सुंदर आहे आणि हेच आपल्याला कायम टिकवायचे आहे आणि ह्या शहराला स्वच्छ कस करणार आणि स्वच्छता आपली कशी राखली जाणार हे आपले सर्वांचे एक नागरिक म्हणून आद्यकर्तव्य आहे. त्याचप्रमाणे कचरामुक्त शहर करण्यासाठी सुध्दा आपण सर्वांनी प्रयत्न केले ह्या शहरामध्ये असलेले घोडबंदर येथील प्रशस्त परिवहनची इमारत ज्याला आजपर्यंत आपण नाव नव्हतं दिलेलं परंतु जगन्नाथ नाना शंकर शेठ यांचे नामकरण करुन त्या बस डेपोचे आपण नामकरण केलं. त्याचप्रमाणे शिक्षण विभागात माझी फार रुची आहे. कारण मी स्वत: शिक्षिका असल्यामुळे मला नेहमीच वाटत होतं की मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये आज आपण पहिली ते सातवीपर्यंतच्या शाळा सुरु करतो. शाळा चालू होत आहेत. गेल्या 30 वर्षाच्या कालावधीमध्ये आज आपण ह्या ठिकाणी नगरसेवक म्हणून कामकाज पाहतोय. परंतु ह्या शहरात जर विद्यार्थ्यांना जर पुढचे शिक्षण घेण्यासाठी पुन्हा प्रायव्हेट शाळेमध्ये जाव लागत असेल तर महापालिकेच्या शिक्षणाचा तेवढा काही फायदा होणार नाही. म्हणून आपल्याला कुठल्याही परिस्थितीमध्ये ह्या जनतेसाठी ह्या शहरातील नागरिकांसाठी मुलांच्या भवितव्यासाठी ह्या मिरा भाईंदर महापालिकेच्या शाळा ह्या दहावीपर्यंत केल्या पाहिजे. ज्यांच्याकडे पैसे आहेत ज्यांच्याकडे ऐपत आहे ते तर शिकतातच पण ज्यांची परिस्थिती खराब आहे ज्यांच्याकडे पैसे नाहीत अशी मुलं शिक्षणापासून वंचित होतात. मी कितीतरी मुलांना पाहिलं की चेणा घोडबंदर ग्रामिण क्षेत्र जे आमचे आहे आदिवासी भाग जो आहे त्या ठिकाणची मुलं सातवी शिकल्यानंतर सरळ घरी बसतात. काहीही कामकाज त्यांना पुढं करता येत नाही आणि नंतर मग वाईट वळणावर सुध्दा गेलेली मुलं आपण त्यांचे भविष्य खराब झालेल पाहिलेलं आहे. मग मुलांचे पुढे भविष्य खराब होऊ नये त्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावं त्यांचे भविष्यामध्ये त्यांची प्रगती व्हावी आणि त्यांनी आपल्या स्वत:च्या पायावर उभे राहावे ह्यासाठी आपण हा प्रयत्न केलेला आहे. मला आता असे म्हणायचे आहे की दहावीपर्यंत आपण ते वर्ग सुरु करणार आहोत पण पुढे भविष्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाच्यामार्फत एक सुंदर असे कॉलेज सुध्दा असावं जेणेकरुन पुढे मुलं त्या शाळेमध्ये शिकतील आणि बारावीपर्यंत आणि पुढचं शिक्षण सुध्दा त्या कॉलेजच्या माध्यमातून ते घेतील. हे प्रयत्न आपण पुढील भविष्यामध्ये सर्व नगरसेवक मिळून करुया. जेणेकरुन ह्या शहराला आपण उत्तम असं काहीतरी दिलं शैक्षणिक क्षेत्रामध्ये अशी नोंद आपल्या प्रशासनाची होईल. त्याचप्रमाणे महिला बालकल्याण समिती माध्यमातून सभापती, उपसभापती ह्या सर्वांच्या मदतीने आपण चांगले काम करण्याचा प्रयत्न केला आणि खरोखर मला माहित आहे की, महापौर निवास जो मला हक्काने तिथे राहता आलं असतं. परंतु त्या निवासस्थानाचा फायदा केवळ महिला म्हणून मी एकटीने घेतला असता माझे कुटुंब फार काही मोठे नाही परंतु मला आतुन असे वाटले की नाही याचा आपण काहीतरी चांगला उपयोग केला पाहिजे. वास्तु 14 वर्षापासून पडलेली आहे. ह्या वास्तुचा चांगला उपयोग झाला पाहिजे आणि हा उपयोग जास्तीत जास्त एक महिला म्हणून महिलांसाठी झाला तर त्याचा चांगला संदेश जनतेला जाईल आणि म्हणून आपण त्याठिकाणी महिला भवन सुरु केलं. एक छोटा प्रयत्न होता आणि म्हणून आज त्याठिकाणी प्रशिक्षण सुरु आहे. महिला बालकल्याणच्या सभापती, उपसभापती त्यांनी सुध्दा चांगल्या पध्दतीने हे कामकाज त्याठिकाणी सुरु केलेले आहे आणि त्या ठिकाणी आज तिथे बरेचशे महिला प्रशिक्षण घेत आहेत. त्याचप्रमाणे समाज विकास विभागातून जेष्ठ

नागरिकांसाठी सुध्दा आपण ह्या शहरातील काहीतरी केलं पाहिजे. त्यांचेही आपण रुणी लागतो. म्हणून जेष्ठ विरंगुळा केंद्र जे आहेत त्यामध्ये आपण त्यांच्या मानधनामध्ये 5 हजार रुपये वाढविले. तेही कमीच आहेत पण पुढे भविष्यामध्ये जेष्ठ नागरिकांसाठी सुध्दा आपल्याला चांगल्यात चांगल कस करता येईल याकडे आपण सर्वांनी लक्ष दिले पाहिजे. त्याचप्रमाणे दिव्यांग जे आपले बंधु भगिनी आहेत त्यांच्यासाठी सुध्दा अनेक समस्या होत्या त्यांच्या समस्या प्रशासनाच्या मदतीने आणि सर्व लोकप्रतिनधींच्या मदतीने आपण सोडविण्याचा प्रयत्न केला. ह्या शहराची महापौर म्हणून कामकाज करत असताना प्रत्येक विषयाचे प्रशासनाकडे लक्ष वेधून घेण्यासाठी पदाधिकारी, गटनेते आणि विरोधी पक्षनेते यांच्या समवेत सातत्याने अनेक बैठका घेतल्या अशा 75 बैठका मी घेतलेल्या आहेत आणि त्यामध्ये केवळ एकच उद्देश होता की प्रशासनाने ह्या विषयाकडे लक्ष द्यावं आणि त्यांचे लक्ष केंद्रीत करावं आणि त्याच्यानंतर त्याचा रिझल्ट मिळावा ह्यासाठी त्या बैठका होत्या त्याचप्रमाणे पशुसंवर्धन विभागात सुध्दा आपण माझ्या महापौर निधीतून एक ॲब्युलन्स दिली जेणेकरुन ह्या शहरातील जे पशु अपघात होतो किंवा त्यांना गरज लागते त्यावेळेला त्यांना हॉस्पीटलमध्ये नेण्यासाठी कुठलेही साधन नसते कधी कधी ते रस्त्यावर असेच पडून राहतात आणि नागरिकांची इच्छा असून सुध्दा त्यांना दवाखान्यात नेऊ शकत नाही अशा वेळेला महापौर निधीतून आपण त्यांच्यासाठी ॲम्ब्युलन्स आणली आणि रुग्णवाहिका आजही आपल्या शहरामध्ये पशुसाठी सुरु आहे. त्याचप्रमाणे माझ्या महापौर दालनामध्ये जेवढे नागरिक आले त्यांनी काही न काही समस्या घेऊन आले कोणी मला भेटायला आले, कोणी माझ्याशी चर्चा करायला आले, कोणी ह्या शहराच्या चांगल्या उपययोजना सांगण्यासाठी आले त्याचप्रमाणे माझे सर्व सन्मा. नगसेवक आपआपल्या प्रभागातील समस्या घेऊन कधी कधी लेटर द्यायला माझ्याकडे यायचे. ते आपल्या पोटतिडकीने सांगायचे मलाही असे वाटायचे की, हे काम लगेच झले पाहिजे. मी माझ्या परीने शक्य तेवढं प्रशासनाला बरोबर घेऊन कामकाज करण्याचा प्रयत्न केला. नगरसेवकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. जेवढ शक्य झालं तेवढं मी त्याचवेळेला केलं आणि खरोखर मी धन्यवाद देईल की ज्या ज्या व्यक्ती मनापासून माझ्याकडे आले त्यांनी मला आपले समजून माझ्याकडे आले आणि मला सेवा करण्याची संधी दिली. तसेच माझ्या प्रभागातील नागरिकांनी मला निवडून दिलं त्यांचेही मी याठिकाणी ह्या शहराची महापौर म्हणून त्यांनाही धन्यवाद देईन. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर शहरातील जेवढी सामाजिक संस्था आहेत जेवढे मंडळ आहेत. जेवढे पदाधिकारी आहेत कार्यकर्ते आहेत त्यांनी सर्वांनी मोलाची साथ दिली कोरोनाच्या वेळेत सुध्दा त्यांनी आपल्याला साथ दिली तसेच गणेश उत्सव नवरात्री उत्सव असु देत ह्या सर्व सणामध्ये सुध्दा त्यांनी आपल्याला साथ दिलेली आहे आणि ह्या शहरातील विकासाची कामं आणि समस्या सोडविण्यासाठी त्यांची सुध्दा आपल्याला मदत झालेली आहे. त्याचप्रमाणे येणाऱ्या भविष्यकाळामध्ये अनेक उद्घाटन करायची बाकी राहिली. बहुतेक नगरसेवकांच्या प्रभागातील सुध्दा उद्घाटन बाकी राहिलेली आहेत. परंतु ते आता उद्याचा शेवटचा दिवस आहे आमची फार मोठी इच्छा होती की नाट्यगृहाचे उद्घाटन आमचे सर्व नगरसेवक असताना हे व्हायला हवे होते परंतु एवढे मोठे नाट्यगृत आणि त्या नाट्यगृहाचा मान सन्मान त्यांना मिळाला पाहिजे म्हणून आपण मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते तो करणार आहोत पण सन्मा. आपले सभागृहनेते प्रशांत दळवीजीने इथे सुचना केलेली आहे की ह्या सभागृहातले सर्व जे सन्मा. नगरसेवक आहेत त्यांच्या नावाचा फलक त्याठिकाणी असावा कारण त्यांचेही प्रयत्न त्या नाट्यगृहासाठी आहेत. त्याचप्रमाणे काशिमिरा येथील पण जो ब्रीज बनविलेला आहे. सुंदर असा ब्रीज आपण त्याठिकाणी बनविलेला आहे. ब्रीजच्या खाली सुंदर असे सुशोभिकरण केलेले आहे. फार मोठा निधी सुध्दा आपण त्याठिकाणी लावलेला आहे. त्याचेही उद्घाटन बाकी आहे. त्यांचेही उद्घाटन आपण मा. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करावे. तसेच धारावी येथील जंजीरे किल्ला, घोडबंदर येथील ऐतिहासिक किल्ला यांचेही सुशोभिकरणाचे काम प्रशासनाने फार चांगल्या पध्दतीने केलेले आहे आणि जलद गतीने केलेले आहे सुंदर रितीने

केलेले आहे त्याचेही उद्घाटन करण्याचे काम आपण बाकी ठेवलेले आहे. मला प्रशासनाला सांगायचे आहे की ती सर्व उद्घाटन आपण करा आणि जनतेला ती खुले करुन द्या. जेणेकरुन ह्या शहरामध्ये जी ऐतिहासिक स्थळ आहेत. ते पाहण्याचा त्यांना लाभ मिळेल. सर्व विभागाने खुपच सुंदर असे काम केलेले आहे मी मनापासून सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांना आणि सर्व त्यांच्या पुऱ्या स्टाफला मी मनापासून त्यांचे अभिनंदन करते. प्रत्येक विभागामध्ये सगळ मनाप्रमाणेच शंभर टक्के आपल्याला जरी प्रतिसाद नसेल मिळाला पण प्रामाणिक प्रयत्न त्या विभागाकडून झालेला आहे. स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर असु दे किंवा माझी वसुंधरा असु देत या अंतर्गत चांगले चांगले उपक्रम केलेले आहेत. उपायुक्त गायकवाड साहेबांनी प्रयत्न केला. गेल्या 12-18 वर्षापासून पदोन्नत्या खरोखर रखडलेल्या होत्या परंतु एक मार्ग त्यांनी खुला करुन दिला त्यांच्या सेवा पुस्तीकांमध्ये म्हणा किंवा त्यांचा पुरा रिपोर्टकार्ड म्हणा, ह्या अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. जेव्हा जेव्हा गायकवाड साहेबांनी त्या आस्थापनेच्या पदभार सांभाळला. त्यांनी ते कामकाज अतिशय चांगल्या पध्दतीने केलं मी स्वत: जाऊन त्यांच्या केबीनमध्ये फिरली त्या कपाटामध्ये सर्वांच्या नोंदी सर्वांचे बुक त्यांनी खुप सुंदर पध्दतीने ठेवलेले आहे आणि रेकॉर्ड असा ठेवलेला आहे की उद्या जर अधिकारी दुसरा बदलला दुसरा उपायुक्त आला तर त्याला सुध्दा ती फाईल लगेच मिळेल, तर कर्मचाऱ्यांनी कुणीही घाबरुन जाण्याचे कारण नाही. तुमच्या पदोन्नत्याबाबत जो निर्णय झालेला आहे आणि पुढील भविष्यामध्ये तुमच्या कुठल्याही कामकाजाला आम्ही विरोध करणार नाही हे शंभर टक्के आणि आम्ही नेहमीच प्रशासनाच्यासोबत होतो आणि सोबत राहणार. कारण प्रशासनाने आम्हा सर्व नगरसेवकांना फार मोठी मदत केलेली आहे. त्याचप्रमाणे जेव्हा जेव्हा प्रशासन चुकलं प्रशासनाचे अधिकारी चुकले जेव्हा जेव्हा आपल्याला असे काही आढळले. प्रत्येक नगरसेवकाने प्रत्येक पदाधिकाऱ्याने ती चुक लक्षात आणुन दिली त्यावेळेला कदाचित अधिकाऱ्यांना मनात वाईट वाटत असेल तर अशा चुका दाखवणे फार गरजेचे असते जर चुका दाखवल्या नाहीत वारंवार त्या चुका हातील. चुका सुधारणे फार महत्वाचे असते. म्हणून कुठल्याही अधिकाऱ्यांनी असे मनात न आणता त्यावरती आपण कुठे चुकलो कसं चुकलो याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. त्याचप्रमाणे गेल्या ह्या ऑगस्टमध्ये 15 ऑगस्ट हा आपला हा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि ह्या कार्यक्रमामध्ये आपले माननीय आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी घर घर तिरंगा हर घर तिरंगा हा संदेश सर्व भारत देशाला दिला आणि जेव्हा आपल्या शहराला सुध्दा सुंदर असं हर घर तिरंगा आणि घर घर तिरंगा अशा पध्दतीने घरावरती झेंडा लावण्यात आला. याकरिता नागरिकांनी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने भरपूर मेहनत घेतली आणि नरेंद्र मोदीजी आपले पंतप्रधान यांना मी धन्यवाद देईल की त्यांनी देशभक्ती करण्याचा एक मौका एक सेवा आम्हाला करण्याची संधी दिली. त्याचप्रमाणे पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते साहेब व सर्व पोलीस प्रशासन यांचे सुध्दा मी मनपूर्वक आभार व्यक्त करते की त्यांनी आम्हाला वेळोवेळी सहकार्य केलं आणि ह्या शहरामध्ये शांतता कशी राहील आणि आम्हाला सुरक्षित कस राहता येईल ह्यासाठी त्यांचे मोलाचे योगदान आम्हाला नेहमीच मिळालं. त्याचप्रमाणे ह्या शहरातील सर्व पत्रकार बंधु आणि चॅनलचे प्रतिनिधी त्यांनी फार मेहनत घेतली. ह्या शहरातील प्रत्येक गोष्टी ज्या चांगल्या असु देत किंवा वाईट असु देत त्याप्रत्येक गोष्टी त्यांनी नागरिकांच्या नजरेसमोर आणण्याचा प्रयत्न केला आणि अशा वेळेला प्रत्येक वेळेला त्यांना त्रास होत असतो काही वेळेला ऊन, पाऊस, थंडी किंवा कुठल्याही परिस्थितीमध्ये ही बातमी गोळा करण्यासाठी त्यांना जावं लागते. अशा परिस्थितीमध्ये पत्रकार बंधुंच्या मागे सातत्याने आपण उभे राहिले पाहिजे. त्यांनाही आपल्या मदतीची गरज असते. ही जाणीव ठेऊन त्यांच्यासाठी सुध्दा आपल्याला कस काय करता येईल याकडे प्रशासनाचे लक्ष वेधून त्यांच्या काही समस्या होत्या त्या आपण सोडविण्याचा प्रयत्न केला आणि आज मला ह्या ठिकाणी खुप मनापासून सांगावस वाटलं ते म्हणजे माझे पी.ए. प्रशांत पाटील, प्रशांत पाटील यांनी खरोखरच मला खुप मोठ

सहकार्य केलं त्यांना मी बऱ्याच वेळा ओरडली खुप म्हणजे असं इतक म्हणजे त्यांच्याकडून काम करुन घेण्यासाठी मला बोलावं लागायचं.

मा. उपमहापौर :-

प्रशांत भाऊ आज तुम्हाला मोठी बहीण भेटली. एक बात हकीकत है की किसीने कहाँ है की हर इन्सान में दिल बसता है किसीने यह भी कहाँ है की हर दिल के अंदर एक बच्चा सा रहता है| उसी बात को देखते हुए किस तरीके से महापौर ताई की हालत वैसे मेरे शब्दो में भी हो रही है लेकिन में अपने आपको कंट्रोल करने की कोशिश कर रहा हूँ| यह है कही ना कही यह रिश्ता बताता है की हम ठिक है दाटते है दबटते है इसके लिए दबटते है की कही ना कही अपना मानते है कही ना कही हम इसके उपर अपना हक्क जताते है, हम गैरो को तो दाटते नही है हमारी जबी दाटने की बात होती है तो अपने कोई दाटते है चाहे अपना बच्चा हो चाहे अपना देश हो चाहे अपना बिझनेस पार्टनर हो चाहे अपना देश हो चाहे अपना बिझनेस पार्टनर हो चाहे अपना पडोसी हो| जहाँ पे अपना हक्क समजते है वही तर प्रशांत भाऊ तुम्हाला फक्त एवढीच विनंती करणार की ज्यावेळी महापौर मॅडम में तुम्हाला जी काही दाट दिली असेल किंवा जो फटका दिला असेल ते महापौरांच्या हिशोबाने नाही ते फक्त आणि फक्त ताईच्या हिशोबाने नाही ते फक्त आणि फक्त ताईच्या हिशोबाने तुम्हाला त्यांच्या लहान भाऊच्या हिशोबाने तुम्हाला तो फटका दिलेला आहे आणि तुम्ही ते मान्य करा. काही वरिष्ठ आपल्याला काही समजून घेतात किंवा मार्गदर्शन देतात. ते फक्त आपल्या भल्यासाठी असतात एवढेच आहे.

मा. महापौर :-

तसेच माझा पूर्ण स्टाफ सुरेखा, अमोल, नितीन परत सदा, प्रकाश, रसिक ह्या सर्वांनी मला खरच खुप मदत केली आणि सगळ्यात विशेष म्हणजे सदैव मी जर एक महापौर असेल तर माझ्या बरोबरीला कोण राहिल तर सचिव प्रशासन पूर्ण एका साईटला होते आणि सचिव शिरवळकर साहेब प्रत्येक विषय कसा घ्यायचा कस बोलायचं याच्यामध्ये कसे पॉईंट आहेत कुठे अडचण होईल, कुठे मुद्दा आपल्याला उपस्थित करायचा आहे किंवा कशा पध्दतीने ठराव हा बरोबर आहे कुठे शब्द चुकला आहे हे सगळ व्यवस्थित रित्या मला त्यांनी सांगितले. खरोखर मी मनापासून त्यांचे सुध्दा आभार व्यक्त करते आणि एक आयुक्त महोदय हे आयुक्त असतील पण माझ्यासाठी खरोखर माझे वडीलभाऊ आहेत. ह्या पध्दतीने त्यांनी मला सपोर्ट केला एक माझ्याकडे त्यांच्याबद्दल एक आपुलकी होती की ते आणि मी एका गावचे आहोत.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम आज पता चला इतना स्नेह और प्यार कैसे|

मा. महापौर :-

परंतु जेव्हा जेव्हा आयुक्तांनी मला असे वाटले की हे चुकीचे होत आहे तर आयुक्त् साहेबांना मी केबीनमध्ये घेऊन नक्कीच त्यांना सांगितले आहे. साहेब असे नाही असे केले तर असे होईल आणि त्यांनाही मान्य केलं आणि त्यांनी खरोखरच चांगल्या पध्दतीने मला मदत केली आणि शक्यतो ह्या शहरामध्ये जस मॅडमने सांगितले की बॅलेन्सींग करुन काम करण्याचे खरोखर तो प्रयत्न माझा होता आपल्या सर्वांना माहित आहे की आमच्या पक्षामध्ये कामकाज करत असताना म्हणा किंवा विपक्ष पक्ष ह्यांना घेऊन चालायचे असताना मला बॅलेंसींग करावी लागली आणि खरोखर हे करत असताना सर्वांनी मला साथ दिली. पक्षाचेच नगरसेवक नाही तर विपक्षाचे नगरसेवकांनी सुध्दा एक आपली बहिण समजून माझ्याकडे मला सहकार्य केलं जेव्हा जेव्हा विषय होते समजून घ्यायचा प्रयत्न केला आणि बहुतेक वेळेला असे झाले की एकमताने सर्वानुमते विषय मंजूर झालेले आहेत. कदाचित काही वेळेला समजा जास्तीत जास्त वोटिंगचा प्रश्न आला असेल अशा पध्दतीने आपण सर्वांनी खुप मला मनापासून मदत केली. महापौर पदापर्यंत पोहोचण्यासाठी मला पण 1997 सालापासून 2022 पर्यंतचा

कालावधी लागला. परंतु एक मनामध्ये आशा असते की नाही माझ गेलेले पद होतं म्हणजे गेल्या भविष्यामध्ये काळामध्ये मला ते पद आधीच 14 वर्षापूर्वी मिळणार होतं परंतु मी संधी चुकली पण कधी कधी म्हणतात परमेश्वर जवळ असतो किंवा आपले प्रयत्न आपण चांगले केले तर कधी त्याचे फळ मिळते. मी तेच समजेल की 1997 पासून 2022 पर्यंतची माझ्या कामकाजाची ही पोचपावती आहे आणि ती मला आपल्या सर्वांच्या सहकार्याने मिळाली पुन्हा एकदा मी असे म्हणेन की माझ्या महापौर कालावधीमध्ये माझ्याकडून कळत नकळत काही चुका झाल्या असतील, मी कुणाला बोलली असेल ओरडली असेल किंवा माझ्यामुळे कोणाचं मन दुखावलं असेल तर खरोखर बहिण समजून माफ करा आणि पुढील वाटचालींसाठी तुम्हा सर्वांना मनापासून हार्दिक शुभेच्छा एवढे बोलून मी माझ्या वाणीला निरोप देते. तसेच पर्युषण पर्व व येणाऱ्या गणेश उत्सवाच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा देते आणि ह्या सभागृहामध्ये माजी उपमहापौर व कॉग्रेसचे नेते मा. मुझफ्फर हुसैन साहेब यांचा आज वाढदिवस आहे मनापासून जन्मदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा देते. ह्या सभागृहामध्ये माझे जे पदाधिकारी आहेत माझ्या भावा सारखे पाठीमागे उभे राहिलेले हसमुख भाई, प्रशांत दळवीजी, धृवकिशोर पाटीलजी सगळे टोटल जेवढे बसलेले सर्व जण ह्या सर्वांना मनपूर्वक आभार व्यक्त करते आणि माझे भाषण संपवते. जय हिंद, जय महाराष्ट्र, जय भिम, जय भारत! आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

(सभा संपल्याची वेळ संध्या. 05.30 वा.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका



(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका